**सुविचार**

यदि आपके संकल्प शुद्ध हैं तो जो आप सोचते हैं, वह कहना तथा जो आप कहते हैं वह करना सरल हो जाता है।

(ब्रह्मकुमारीज)

विश्वसनीय बातम्यांचे एकमेव वृत्तपत्र

# दैनिक यशवंत

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर
जि. लातूर
प्रवेश सूरू
2023-24
11 th, 12 th & Repeaters
NEET / IIT- JEE
संपर्क : 9423351370, 9890103190
अध्यक्ष : मल्लिकार्जूनअप्पा गदगेअप्पा मानकरी
सचिव : रामचंद्र पंढरीनाथ तिरूके

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/रविवार दि. २५ फेब्रुवारी २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१०६ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

## आप-काँग्रेसची ४ राज्यांत युती



नवी दिल्ली : आगामी लोकसभा निवडणुकीतील जागावाटपाबाबत आम आदमी पार्टी (आप) आणि काँग्रेसमध्ये एकमत झाले असून दिल्ली, गुजरात, गोवा आणि हरियाणा अशा ४ राज्यांमध्ये आप-काँग्रेसमधील जागावाटपावर शिक्कामोर्तब झाले आहे. आगामी लोकसभा निवडणुकीसंदर्भात आप आणि काँग्रेस यांच्यातील करार अंतिम झाला आहे.

आज दिल्लीत दोन्ही पक्षांनी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन जागावाटपाची माहिती दिली. पत्रकार परिषदेला आपकडून आतिशी, संदीप पाठक आणि सौरभ भारद्वाज तर काँग्रेसकडून मुकुल वासनिक, दीपक बाबरिया आणि अरविंदर सिंग लवली उपस्थित होते. यावेळी काँग्रेस नेते मुकुल वासनिक म्हणाले की, इंडिया ब्लॉकमध्ये समाविष्ट असलेल्या पक्षांमध्ये जागावाटपावर चर्चा सुरू आहे. दोन दिवसांपूर्वी घोषणा करण्यात आली होती. सध्या भारतीय लोकशाहीसमोरील आव्हानांचा सामना करण्यासाठी आप आणि काँग्रेसने लोकसभा निवडणूक एकत्र लढण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही आपापल्या चिन्हावर निवडणूक लढवणार आहे, पण एकदिलाने लढून भाजपाचा पराभव करू, असे मुकुल वासनिक म्हणाले. तसेच, आप आणि लखनौमध्ये सपा-काँग्रेस आघाडीची काँग्रेसमध्ये जागावाटपावर बरीच चर्चा झाली. त्यानंतर जागावाटपाचा करार अंतिम झाला. दिल्लीत चार जागांवर आप निवडणूक लढवणार आहे. तर काँग्रेसने चांदणी चौकसह तीन जागा लढवणार आहे, असे मुकुल वासनिक यांनी सांगितले.

कुठे, किती जागा लढणार?

चंदीगड आणि गोव्यातील दोन्ही लोकसभा जागांवर काँग्रेस आपला उमेदवार उभे करणार आहे. हरयाणात काँग्रेस ९ जागांवर तर आप १ जागा लढवणार आहे. गुजरातमध्ये आप दोन तर काँग्रेस २४ जागांवर निवडणूक लढवणार आहे असेही मुकुल वासनिक म्हणाले. दिल्लीतील नवी दिल्ली, पश्रि्चम दिल्ली, दक्षिण दिल्ली आणि पूर्व दिल्ली या लोकसभा मतदारसंघातून आप निवडणूक लढवणार आहे. तर काँग्रेस ईशान्य, उत्तर पश्चिम आणि चांदणी चौक या जागांवर निवडणूक लढवणार आहे.

## इराणचा पुन्हा पाकिस्तानात सर्जिकल स्ट्राईक

तेहरान - तानी हद्दीत जैश अल-अदल या दहशतवादी संघटनेचा कमांडर इस्माईल शाह बक्श आणि त्याच्या काही साथीदारांना ठार केल्याचा दावा इराणच्या लष्करी दलाने केला आहे.

इराण इंटरनॅशनल इंग्लिश या वृत्तवाहिनीने शनिवारी सकाळी देशाच्या सरकारी माध्यमांच्या हवाल्याने ही बातमी प्रसारित केली. एक महिन्यापूर्वीही इराणने पाकिस्तानच्या हद्दीत घुसून जैश अल-अदलच्या ठिकाणांवर हवाई हल्ले केले होते. त्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्ताननेही इराणच्या हद्दीत हवाई हल्ला केला होता.

अल अरबिया न्यूज रिपोर्टनुसार, जैश अल-अदल दहशतवादी संघटना २०१२ मध्ये उदयास आली. या संघटनेचे प्रमुख केंद्र इराणच्या दक्षिणेकडील (पान ७ वर)

## पक्षाच्या तुतारी चिन्हाचे अनावरण
## ४० वर्षांनी शरद पवार रायगडावर



रायगड : राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर शरद पवार गटाला निवडणूक आयोगाने नवे नाव आणि चिन्ह बहाल केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाला नुकतेच केंद्रीय निवडणूक आयोगाने तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्ह दिले आहे. पक्षाच्या या नवीन चिन्हाचे अनावरण शरद पवार गटाने रायगड किल्लयावर केले. यावेळी शरद पवार, सुप्रिया सुळे, जयंत पाटील यांच्यासह पक्षातील सर्व ज्येष्ठ नेते आणि पदाधिकारी हजर होते.

रायगड किल्लयावर पक्षाच्या अनावरण चिन्हासाठी शरद पवार हे तब्बल ४० वर्षांनी किल्लयावर आले. आधी रोप-वे आणि मग पालखीतून शरद पवारांना किल्लयावर नेण्यात आले. त्याठिकाणी पोवाडे आणि सांस्कृतिक कार्यक्रमासह पक्षाच्या नव्या चिन्हाचे अनावरण करण्यात आले. यावेळी शरद पवार म्हणाले की, सध्याचा संघर्ष हा वैचारिक संघर्ष आहे. या देशात अनेक राजे झाले, संस्थानिक झाले परंतु रयतेचा राजा एकच झाला. सध्या राज्यात अडचणी वाढतील अशी स्थिती आहे. शिवछत्रपतींचे राज्य सामान्यांची सेवा करणारे राज्य होते. आज महाराष्ट्राची स्थिती बदलायची असेल तर पुन्हा एकदा याठिकाणी जनतेचे राज्य येईल यासाठी प्रयत्न करायचे आहेत. निवडणूक आयोगाने रणशिंग फुंकायला तुतारी दिली आहे.

संघर्षातून प्रेरणा देणारी ही तुतारी आहे. तुमच्या संघर्षातून, त्यागातून (पान ७ वर)

## म्हाडाचे प्रकल्प वेळेत पूर्ण करा अन्यथा बिल्डरांना दंड

ठाणे : प्रतिनिधी- म्हाडाने वेळेत गृहनिर्माण प्रकल्प पूर्ण करून घ्यायला हवेत, अन्यथा प्रकल्प रेंगाळून पुन्हा त्यांची दुरुस्ती करण्याची वेळ येते. जे बिल्डर्स वेळेत प्रकल्प पूर्ण करतील, त्यांना बक्षीस द्यावे आणि जे मर्यादित वेळेत पूर्ण करणार नाहीत, त्या बिल्डरला दंड लावण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज ठाण्यातील कोकण म्हाडाच्या लॉटरी समारंभात दिले.

कोकण म्हाडाच्या ५३११ घरांची लॉटरी आज ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे झालेल्या



समारंभात काढण्यात आली. त्यावेळी विजेत्यांना शुभेच्छा देताना मुख्यमंत्री शिंदे यांनी गृह प्रकल्पांना होणा-या विलंबाबाबत चिंता व्यक्त केली.

गुणवत्तापूर्ण घरे वेळेत पूर्ण करण्याची गरज व्यक्त करीत शेवटच्या घटकापर्यंत फायदा पोहोचण्यासाठी नियम सूट करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी देऊन म्हाडाच्या घरांसाठी अर्ज करणा-या ३० हजार लोकांना घरे देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी आश्र्वासित केले. यावेळी गृहनिर्माण मंत्री अनिल सावे, संजीव जयस्वाल आदी मान्यवर उपस्थित होते.

## नवे कायदे १ जुलैपासून



नवी दिल्ली : केंद्र सरकारने अलीकडेच भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता यांमध्ये काही बदल केले. या कायद्यांमध्ये केलेल्या नव्या सुधारणा, नव्या तरतुदी, नवीन कलमे दि. १ जुलैपासून लागू केली जाणार आहेत. भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष अधिनियम हे नवीन कायदे भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता यांची जागा घेणार असल्याची माहिती गृहमंत्री अमित शहा यांनी देण्यात आली आहे.

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात लोकसभा आणि राज्यसभेत हे नवीन कायदे, तरतुदी मंजूर करण्यात आल्या होत्या. त्यानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी यावर सही केली. आता एक जुलैपासून हे कायदे लागू करण्यात येणार आहेत. हे तीन कायदे भारतीय पुरावा कायदा १८७२, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ आणि आयपीसी यांची जागा घेतील. तज्ज्ञांच्या मते, तीन नवीन कायद्यांमुळे दहशतवाद, मॉब लिंचिंग आणि राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या गुन्ह्यांसाठी शिक्षा अधिक कडक होणार आहे. भारतीय न्याय संहितेत २० नवीन गुन्हे समाविष्ट करण्यात आले आहेत. तर आयपीसीमधील १९ तरतुदी काढून टाकण्यात आल्या आहेत. तसेच ३३ गुन्ह्यांमध्ये तुरुंगवासाची शिक्षा वाढविण्यात आली आहे. तर ८३ तरतुदींमध्ये दंडाच्या शिक्षेत वाढ करण्यात आली आहे, याशिवाय २३ गुन्ह्यांमध्ये अनिवार्य किमान शिक्षेची तरतूद करण्यात आली असून ६ गुन्ह्यांमध्ये सामुदायिक सेवा या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

कोणत्या कायद्यांत नेमका काय बदल झाला?

- आयपीएस : कोणते कृत्य गुन्हा आहे आणि त्यासाठी कोणती शिक्षा होईल? हे या अंतर्गत ठरवले जाते. आता हा कायदा भारतीय न्याय संहिता म्हणून ओळखला जाईल. आयपीसीमध्ये ५११ कलमे होती, तर नवीन भारतीय न्याय संहितेत ३५८ कलमे असतील. यामध्ये २१ नवीन गुन्ह्यांची भर पडली आहे. ४१ गुन्ह्यांमध्ये कारावासाच्या कालावधीत वाढ करण्यात आली आहे. ८२ गुन्ह्यांच्या शिक्षेत वाढ करण्यात आली आहे. २५ गुन्ह्यांत किमान शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. तर ६ गुन्ह्यांमध्ये समाजसेवेची शिक्षा होणार आहे. तर अनेक कलमे रद्द करण्यात आली आहेत.

- सीआरपीसी : अटक, तपास आणि खटला चालवण्याची प्रक्रिया सीआरपीसीनुसार होते. (पान ७ वर)

## राज्यात गारठा



पुणे : उत्तर भारतात पश्चिमी विक्षोप सक्रिय असल्यामुळे उत्तरेकडून थंड वारे राज्यात येत आहे. त्यामुळे राज्यभरात कमाल-किमान तापमानात सरासरी एक ते दोन अंश सेल्सिअसने घट झाली आहे. पुण्यात सर्वांत कमी ११.७ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, हिमालयीन रांगांमध्ये आणि शेजारील परिसरात पश्चिमी विक्षोप सक्रिय आहे. त्यामुळे उत्तर भारतातून थंड वारे राज्यात येत आहे. त्यामुळे कमाल-किमान तापमानात सरासरी एक ते दोन अंश सेल्सिअसने घट झाली आहे. शुक्रवारी पुण्यात सर्वांत कमी ११.७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. मध्य महाराष्ट्रात किमान तापमान सरासरी १३ ते १४ अंशांवर होते. कोकण-गोव्यात २० अंश सेल्सिअस, विदर्भ आणि मराठवाड्यात किमान तापमान सरासरी १६ अंश सेल्सिअसवर होते. तापमानात झालेली घट पुढील दोन ते तीन दिवस कायम राहण्याचा अंदाज आहे. त्यानंतर पुन्हा तापमानवाढीचा अंदाज आहे. आग्नेयेकडून येणा-या वा-यामुळे राज्यात बाष्पयुक्त हवा येत आहे.

विदर्भात सतर्कतेचा इशारा

दक्षिण छत्तीसगड आणि शेजारील प्रदेशात हवेच्या वरच्या (पान ७ वर)

## अंड्याच्या दरात मोठी घसरण

मुंबई : चालू फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीपासून अंड्याच्या दरात चढ-उतार सुरूच असून, आज अंडी दरात मोठी घसरण झाली आहे.

मुख्यत्वे करून महाराष्ट्रासह देशातील सर्वच भागांमध्ये ही घसरण नोंदवली गेली असून, अंडी दर सध्या प्रति शेकडा ६०० रुपयांहून खाली घसरले आहेत. मागील आठवड्यात महाराष्ट्र आणि विशेषत: दक्षिणेकडील काही भागांमध्ये अंड्याचे दर हे शेकडा ६१५ रुपयांपर्यंत वाढलेले होते.

पूर्वेकडील पश्चिम बंगालमध्येही अंडी दराने ६०० रुपये प्रति शेकडा हा आकडा पार केला होता. मात्र आज कोलकाता (पान ७ वर)

## सध्याचे शिक्षण न परवडणारे उच्च न्यायालयाचे निरीक्षण

मुंबई : सध्याचे शिक्षण परवडणारे नाही. मानवतेची व्यापकता वाढविण्यासाठी देशातील प्रत्येक नागरिकापर्यंत दर्जेदार शिक्षण पोहोचविणे, ही सरकारची घटनात्मक जबाबदारी आहे, असे निरीक्षण अलीकडेच मुंबई उच्च न्यायालयाने नोंदविले.



आपल्या संस्कृतीत शिक्षण हे धर्मपरायण असले तरी बदलत्या काळानुसार त्याचा रंग बदलला आहे आणि शिक्षण न परवडणारे झाले आहे. सर्व नागरिकांपर्यंत दर्जेदार शिक्षण पोहोचविण्याची घटनात्मक जबाबदारी सरकारची आहे, असे निरीक्षण न्या. अतुल चांदुरकर व न्या. जितेंद्र जैन यांच्या खंडपीठाने नोंदविले.

राज्यात नवीन महाविद्यालये स्थापण्यासाठी केवळ शिक्षण क्षेत्रात पूर्वानुभव असलेल्या लोकांनाच परवानगी दिली तर, त्यांची या क्षेत्रात मक्तेदारी निर्माण होईल आणि नवीन संस्थांना या क्षेत्रात प्रवेश करता येणार नाही. नवीन संस्थांना महाविद्यालये स्थापण्याची परवानगी देताना त्यांच्या क्षमतेचे मूल्यांकन करणे आणि त्यांना शैक्षणिक क्षेत्रात अनुभव असणे आवश्यक आहे. परंतु, सरकारला समानता राखण्यासाठी समतोल राखणे आवश्यक आहे, असे मत खंडपीठाने व्यक्त केले.

पुणे ज्याला पूर्वेचे ऑक्सफर्ड म्हटले जाते, हे शैक्षणिक संस्थांचे केंद्र आहे. संपूर्ण भारतातील, परदेशातील विद्यार्थी याठिकाणी (पान ७ वर)

## उ.प्र. पोलिस भरती परीक्षा रद्द

लखनौ : कॉन्स्टेबल भरती परीक्षेचा फेपर फुटल्या प्रकरणी उत्तर प्रदेशमधील हजारो उमेदवारांनी शुक्रवारी पोलिस भरती परीक्षा रद्द करून परीक्षा दुबार घेण्याची मागणी करत विविध जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयावर तीव्र निदर्शने केली होती. यावेळी पोलिसांनी निदर्शन करणा-या विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज केला. यावेळी अनेक विद्यार्थीजखमी झाले होते. परिणामी उत्तर प्रदेशातील लोखो उमेदवारांनी डबल इंजिन सरकारवर जोरदार टीका केली होती, दरम्यान या उमेदवारांच्या आंदोलनाला यश मिळाले असून उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी येणा-या लोकसभेत





भाजपला दगाफटका होऊ नये म्हणून कॉन्स्टेबल भरती परीक्षा रद्द करण्याची घोषणा शनिवारी केली.

दरम्यान राहुल गांधीची भारत जोडो न्याय यात्रेतही या उमेदवारांनी आपली कैफियत राहुल गांधीकडे मांडली होती. आम्ही अनेक वर्षापासून परीक्षेचा अभ्यास करून या परीक्षेची तयारी केली आहे. मात्र, परीक्षेचा पेपर फुटल्यामुळे न अभ्यास केलेले उमेदवार पास होतील आणि नोकरी मिळवतील, मात्र, आम्ही दिवसरात्र अभ्यास करून ही आम्हाला यश मिळणार नाही तर अशा (पान ७ वर)

## अंतर्गत रस्त्याच्या कामासाठी आ. कराड यांच्या प्रयत्नातून निधी मंजूर



लातूर / प्रतिनिधी- लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात असलेल्या ६० गावात अंतर्गत रस्त्याच्या ८२ कामासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत तब्बल ८ कोटी रुपयाचा निधी मंजूर झाला आहे. सदरील निधी मंजूर झाल्याने त्या त्या गावातील भाजपाच्या कार्यकर्त्यांनी आणि नागरिकांनी आ. कराड यांचे आभार व्यक्त केले आहेत.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील गावागावात वाडी वस्तीत शासनाच्या विविध योजनेचा लाभ मिळावा यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी मतदार संघातील विविध गावात अंतर्गत रस्त्याच्या कामासाठी निधी मिळावा याकरीता राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री ना. संदिपानजी भुमरे यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता.

लातूर जिल्ह्यातील गावांतर्गत रस्त्याच्या ४०५ कामांना २२ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. आ. रमेशआप्पा कराड यांच्या पाठपुराव्यामुळे लातूर ग्रामीण मतदार संघातील ६० गावातील ८२ कामांना तब्बल ८ कोटी रुपयाचा निधी मंजूर झाला आहे. त्यात लातूर तालुक्यातील २९ गावातील ४५ कामासाठी ४ कोटी ९५ लक्ष रुपयाचा रेणापूर तालुक्यातील २२ गावातील २४ कामासाठी १ कोटी ९५ लक्ष रुपयाचा तर औसा तालुक्यातील भादा सर्कल मध्ये येणाऱ्या ९ गावातील १३ कामाकरिता एक कोटी दहा लक्ष रुपयाचा निधी मंजूर झाला आहे. मंजूर झालेल्या निधीतून त्या त्या गावात सिमेंट रस्त्याची आणि पेव्हर ब्लॉकचे रस्त्याची कामे करण्यात येणार आहेत.

लातूर ग्रामीण मतदार संघातील रस्त्याची कामे मंजूर झालेल्या गावात लातूर तालुका - बोकनगाव दोन ३० लक्ष , मळवटी १५ लक्ष, बिंदगीहाळ दोन कामे ३० लक्ष, मुरुड अकोला सहा कामे ५५ लक्ष, ३० लक्ष, खुलगापूर तीन कामे ३० लक्ष, बोरगाव बु. दोन कामे ३०, मळवटी १५ लक्ष, भिसे वाघोली तीन कामे ३० लक्ष, चिंचोली ब. दोन कामे ३५ लक्ष, नागझरी ३० लक्ष, टाकळी ब. ३० लक्ष, सावरगाव दोन २५ लक्ष, चिंचोलीराव ५ लक्ष, दिंडेगाव (पान ७ वर)



## लातूर येथील नमो महारोजगार मेळावा आणि करिअर मार्गदर्शन

लातूर, /प्रतिनिधी : राज्य शासनाने प्रत्येक महसूल विभागात नमो महारोजगार मेळावा आयोजित करण्याचा निर्णय घेतला असून छत्रपती संभाजीनगर विभागाचा मेळावा लातूर येथे २३ व २४ फेब्रुवारी रोजी पार पडला. शासकीय महिला तंत्रनिकेतन समोरील मैदानात झालेल्या या नमो महारोजगार मेळावा आणि करिअर मार्गदर्शन शिबिरा त मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील युवक-युवतींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. २४ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या रोजगार इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीमधून उद्योजकांनी ४ हजार ५४८ उमेदवारांची जागेवरच निवड केली. तर ७ हजार ८९७ जणांच्या निवडीबाबतची कार्यवाही पुढील टप्प्यात होणार आहे. यावेळी झालेल्या करिअर मार्गदर्शन शिबिरालाही युवा वर्गाचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

जागेवर निवड झालेल्या युवक-युवतींना आमदार संभाजी पाटील निलंगेकर, विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात निवडपत्राचे वितरण करण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, सहायक जिल्हाधिकारी नमन गोयल, प्रेरणा होनराव यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. मेळाव्यात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत ३५ जणांना १ कोटी ५१ लाख ७६ हजार रुपये, मुद्रा योजना अंतर्गत ५ व्यक्तींना १८ लाख रुपयांचे धनादेश उपस्थितांच्या हस्ते वितरीत करण्यात आले. या मेळाव्याचे औचित्य साधून जिल्हा परिषद अंतर्गत १४ संवर्गात अनुकंपा (पान ७ वर)

## १०-१२ वीच्या परीक्षांमध्ये आकृत्या आता पेनानेही काढता येणार

पुणे : राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे इयत्ता दहावी- बारावीच्या परीक्षांमध्ये भाषा विषयाच्या कृती पत्रिकेसंदर्भातील प्रश्र्नांवरील आकृत्या पेनकिंवा पेन्सिल यापैकी कशानेही विद्यार्थ्यांनी काढल्या, तरी त्यांना गुण देण्यात यावेत असा निर्णय शनिवारी (दि. २४) बोर्डाच्या परीक्षा मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

यासंबंधी सर्व मुख्य नियामकांनादेखील सूचना दिल्या जाणार आहेत. येत्या १ मार्चपासून दहावीच्या परीक्षेला सुरुवात होणार आहे, त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होणार आहे.

राज्य मंडळातर्फे सध्या इयत्ता बारावीच्या परीक्षा सुरू असून, येत्या १ मार्चपासून दहावीच्या परीक्षेला सुरुवात होणार आहे. भाषा विषयासाठी मंडळाकडून कृती पत्रिकेवरील प्रश्न विचारले जातात. या प्रश्नांसाठी काही वेळा आकृत्या काढाव्या लागतात. या आकृत्या पेनने काढाव्यात की पेन्सिलने? यावर शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्यामध्ये गोंधळाचे वातावरण होते. तसेच दहावीच्या मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषा विषयामध्ये परिच्छेदावर आधारित आकलन कृती किंवा आकृत्या पेनाने काढल्या म्हणून अर्धा गुण कापतात. त्यांनी कापला नाही तर कित्येकदा मॉडरेटरच्या स्तरावर अर्धा गुण कापला जातो. यातच आकृती पेनाने काढावी, असा नियम प्रश्नपत्रिकेत आहे. मात्र, पेन्सिलने आकृती काढली तर अर्धा गुण कापावा असा कुठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. मग हे गुण का कापले जातात? असा प्रश्र्न पर्यवेक्षक आणि मॉडरेटर विचारत होते.

त्यामुळे शिक्षण क्षेत्रात चर्चा सुरू होती. यावर शनिवारी राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या परीक्षा मंडळाच्या बैठकीत (पान ७ वर)

दैनिक
# यशवंत
# अहमदपूर/चाकूर परिसर
रविवार दि.२५ फेब्रुवारी २०२४
२
E-mail :- yashahmedpur@gmail.com संपर्क मो.९८५०२७३०४७, ९८२३११२९०७

आयुष्यात काही साध्य करण्यासाठी दोन गोष्टींची आवश्यकता असते, संकल्प आणि संघर्ष

# भारतीय लोकशाही धोक्याची आहे
## निवृत्तसनदी अधिकारी व सिनेअभिनेते अनिल मोरे यांचे प्रतिपादन

अहमदपूर दि.२२(कारामुंगीकर) लोकशाही निष्ठ, धर्मनिरपेक्ष आणी संविधानाची बुज असणाऱ्या तमाम भारतीयांनो रात्र वैऱ्याची आहे. संविधानाच्या अस्तित्वावरच घाला बसण्याची दाट शक्यता आहे. आज खऱ्या अर्थाने राज्यघटनेची होणारी पायमल्ली, लोकशाही आणी स्वायत्त संस्थेचा ऱ्हास त्यामध्ये सत्ताधाऱ्यांचा हस्तक्षेप याचा परिणाम म्हणून भारतीय लोकशाही धोक्यात आलेली आहे, असे प्रातिपादन नांदेड येथील माजी सनदी अधिकारी तथा मराठी सिनेकलावंत अनिल मोरे यांनी व्यक्त केले.




ते अहमदपूर येथील मराठा सेवा संघ पुरस्कृत जिजाऊ सावित्री बचत गट व मराठा क्रांती महिला बचत गट यांनी शिवजयंतीनिमित आयोजित केलेल्या म शिवमेळा म या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती पुरस्कार विजेते निवृत्त प्रा. दत्ता भाऊ गलाले तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते तथा मराठा सेवा संघाचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. गोविंद शेळके आर्दीची उपस्थिती होती.

पुढे बोलताना मोरे म्हणाले की, जय श्रीरामा च्या घोषणा देवून स्त्रीयांच्या अब्रूची विटंबना करणारे मणिपूर बलात्कार व हत्याकांड प्रकरण, बिलकिस बानू बलत्कार व कुटूंबीयांची हत्या प्रकरणी आरोपीची निर्दोष मुक्तता व माणुसकीला काळीमा फासणारा लाजीरवाणा सत्कार, शेतकऱ्यांचे बलिदान, सीबीआय व ईडीची भिती घालून विरोधी पक्ष फोडणे व विरोधी पक्षातील भ्रष्टाचारी राज्यकर्त्यांना स्व-पक्षात घेऊन सत्तेच्या वाशिंग मशीनमध्ये घालून स्वच्छ करणे, यामुळे लोकशाही धोक्यात आली असल्याचे सांगीतले.

यावेळी माजी मंत्री बाळासाहेब जाधव, मोहीब कादरी, सत्यनारायण काळे, द. मा.माने, नारायण कांबळे यांच्यासह महिला भगिनींची उपस्थिती होती. सदरील कार्यक्रमाचे सुत्रसंचलन गणपत जाधव यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आशोकराव चापटे तर उपस्थितांचे आभार समर्थ लोहकरे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष प्रा. नाना कदम, दत्ता कदम, शिवशंकर लांडगे, सिध्दार्थ दापके, वडवळे सर आदींनी श्रम घेतले. यावेळी परिसरातील नागरीक उपस्थित होते.

# भक्ती स्थळ समाधी लिंग स्थापना धार्मिक सोहळा आरंभ
## सप्त नद्या तीन समुद्र व बारा ज्योतिर्लिंगच्या जलाने समाधी रुद्राभिषेक
## भुयारी समाधीचे दर्शन होणार बंद



अहमदपूर दि.२४(कारामुंगीकर) भक्ती स्थळ समाधी लिंग स्थापना धार्मिक सोहळा आरंभ झाला असुन सप्त नद्या तीन समुद्र व बारा ज्योतिर्लिंग च्या जलाने समाधी रुद्राभिषेक करण्यात आला असुन भुयारी समाधीचे दर्शन होणार बंद आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, अहमदपूर प्रतिनिधी राष्ट्रसंत सद्गुरु डॉक्टर शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या संजीवन समाधीच्या लिंग स्थापना निमित्त आयोजित धार्मिक विधी आज प्रारंभ करण्यात आला यात शिवलिंगास जलादिवास धान्या दिवास पुषा दीवास बस मध्ये पण असे संस्कार करण्यात आले यावेळी तीन समुद्र सप्त नद्या व बारा ज्योतिर्लिंगाच्या जलाने शिवाचार्यच्या उपस्थितीत समाधीचा रुद्राभिषेक करण्यात आला अनेक संत महंत शिवाचार्य उपस्थित होते यात नीलकंठ शिवाचार्य महाराज धारेश्वर कर डॉ वीरू पक्ष शिवाचार्य महाराज मनमत धाम डॉ नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज पुरणें कर रुद्रमणी शिवाचार्य महाराज मुदखेडकर शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर शंभू लिंग शिवाचार्य महाराज अंबाजोगाई कर शंकरलिंग शिवाचार्य महाराज शिरूर अंत पालकर नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज सोनपेठ कर प्रभूदेव शिवाचार्य महाराज माडेकर शिवाचार्य महाराज मानूरकर अमृतेश्वर शिवाचार्य महाराज जिंतूरकर दिगंबर शिवाचार्य महाराज वसमतकर शंकरलिंग शिवाचार्य महाराज हानेगावकर महादेव शिवाचार्य महाराज कळमनुरीकर बसवलिंग शिवाचार्य महाराज कवळस्कर सिद्धलिंग शिवाचार्य महाराज देवणीकर सिद्ध चैतन्य महाराज साखरखेर्डा गुरुपादेश्वर शिवाचार्य महाराज गिरगावकर शिवलिंग शिवाचार्य महाराज उजनीकर संगणबसव शिवाचार्य महाराज निलंगेकर बाल आनंद महाराज चापोलीकर सह अनेक संत उपस्थितीत धार्मिक विधी पार पडण्यात आला यावेळी उपस्थित गुरुवार यांचे मार्गदर्शन झाले राष्ट्रसंतांचे उत्तर अधिकारी राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज व अडोळती मताचे डॉक्टर अभिषेक शिवाचार्य महाराज बुद्धी स्वामी मठ हाडोळती यांचेही प्रवचने आयोजित करण्यात आले होते त्यानंतर १ दाम्पत्यांच्या हस्ते समाधी लिंग पूजन करण्यात येऊन आलेल्या दांपत्यांना विश्वस्त मंडळाच्या वतीने भेटवस्तू देण्यात आली यावेळी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष भगवंतराव पाटील चांभारगेकर सचिव सुप्रियाताई गोटे कोषाध्यक्ष सिद्धेश्वर पाटील शिवप्रसाद कोरे धन्यकुमार शिवणकर गंगाधर कोदळे मनमत आप्पा पालापुरे एडवोकेट बाबुराव देशमुख रजनीताई मंगलगे पद्मिनी ताई खराडे मल्लेश कपाटे संजय ऊस दुर्गे सौ विजया विश्वंभर स्वामी बालाजी होळकर हजारो भाविक भक्त उपस्थित होते सर्व शिवाचार्यांचे यजमानाच्या हस्ते पूजन करण्यात आले यावेळी भक्ती स्थळाचे प्रमुख आचार्य गुरुराज स्वामी यांनी उपस्थित शिवाचार्य यांचा गौरव केल.



### भुयारी समाधी मंदिर दर्शन बंद होणार

राष्ट्रसंतांचे मूळ समाधी असलेले भुयारी समाधी मंदिर २५ फेब्रुवारीला सायंकाळी बंद होणार असून ते गुरुपौर्णिमा २१ जुलै रोजी भक्तांच्या दर्शनासाठी उघडले जाणार आहे मात्र समाधीवरचे वरील समाधी मंदिरातील लिंग सर्व भक्तांच्या खुले करण्यात आले आहे.

सप्त नद्या बारा ज्योतिर्लिंगाचे जलअर्पण सब फिरत बार बार समाधी लिंग दर्शन एक बार या उक्तीप्रमाणे या समाधी लिंगाच्या रुद्राभिषेकासाठी तीन समुद्र सात नद्या आणि बारा ज्योतिर्लिंगाचे जल मंगल वाद्याच्या सोबत आचार्य गुरुराज स्वामी सर्व विश्वस्त मंडळ राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज अभिषेक शिवाचार्य महाराज यांनी डोक्यावर मंगल कलश घेऊन समाधी स्थळे आणून सर्व शिवाचार्यांच्या शुभ हस्ते त्याचा जलाभिषेक करण्यात आला.

# जिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धेत समृद्धी देशमुख द्वितीय

हाडोळती दि. २४(नागसेन गायकवाड): जिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धेत समृद्धी देशमुख द्वितीय आली आहे. सदरील वकृत्व स्पर्धा १९ फेब्रुवारी २०२४सार्वजनिक छत्रपती शिवजयंती महोत्सव समिति मानखेड तालुका ३५००रु.रोख बक्षीस देऊन गौरव करण्यात आले. या यशाबद्दल संस्था अध्यक्ष प्राध्यापक पी.टी. पवार सर , सचिव डॉक्टर निलेश



याबाबत अधिक माहिती अशी की, हाडोळती तालुका अहमदपूर येथील दयानंद विद्यालयातील इयत्ता आठवीची विद्यार्थिनी कुमारी समृद्धी वैभव राव देशमुख हिने जिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवलेला अहमदपूर जिल्हा लातूर यांनी आयोजित केली होती.

सदरील स्पर्धेत कुमारी समृद्धी वैभवराव देशमुख हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केल्यामुळे सार्वजनिक छत्रपती शिवजयंती महोत्सव समिती मानखेड च्या वतीने तिला ट्रॉफी, सन्मानपत्र व भैय्या पवार, प्राचार्य कौडगावे जि.व्ही., कार्यकारी संचालक ईश्वर जोगदंड, पर्यवेक्षक अशोक कोटसूळवार, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व गावकरी यांनी अभिनंदन केले आहे. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

# मोरे कुटुंबीयांकडून भेट दिलेल्या वॉटर फिल्टर चे उदघाटन



हाडोळती दि. २४(नागसेन गायकवाड): हाडोळती तालुका अहमदपूर येथील किसान शिक्षण प्रसारक मंडळाच्या संकुलास स्वर्गीय अविनाश गणेशराव मोरे यांच्या प्रथम पुण्यस्मरणा निमित्ताने त्यांच्या कुटुंबीयांकडून भेट दिल्या गेलेल्या वॉटर फिल्टर च्या उद्घाटनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.पी टी पवार सर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून संजयजी सोनवणे(बहुउद्देशीय सेवा संस्था लातूर) सचिव डॉक्टर निलेश भैय्या पवार, श्रीमती प्रेमलताताई अविनाश मोरे , माजी प्राचार्य व्यंकटराव मुळके, कार्यकारी संचालक ईश्वर जोगदंड, प्राचार्य दीपक बच्चेवार , प्राचार्य कौडगावे गणपत, डॉ. हर्षराज देशमुख ,डॉ. रोहिणी हर्षराज देशमुख, शितलताई अविनाश मोरे, मुख्याध्यापक अर्जुन कानवटे, माधवराव पवार, पोलीस पाटील बालाजी मिरकले, विठ्ठल पवार, प्रा.बाबुराव इंगळे आदी मान्यवर उपस्थित होते.

स्वर्गीय अविनाश गणेशराव मोरे यांच्या प्रथम पुण्यस्मरणाचे औचित्य साधून स्वर्गीय अविनाश मोरे यांच्या सामाजिक कार्याचा एक भाग म्हणून मोरे कुटुंबियांकडून किसान शिक्षण प्रसारक मंडळाच्या संकुलास वॉटर फिल्टर (शुद्ध जल यंत्रणा) भेट देऊन संकुलातील विद्यार्थ्यांना पिण्याचे शुद्ध पाणी पाणी उपलब्ध करून देण्याची सुविधा करण्यात आली.यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सदरील वॉटर फिल्टरचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्वर्गीय अविनाश मोरे यांच्या कार्याबद्दल विचार व्यक्त केले .त्यावेळी स्वर्गीय अविनाश मोरे कुटुंबीय, त्यांचे गणगोत ,शिक्षक, विद्यार्थी, गावातील प्रतिष्ठित नागरिक, पालक उपस्थित होते.

**दैनिक यशवंत नियमित वाचा**

# क. तुळशीराम पवार महाविद्यालयातील रासेयोचे उद्घाटन संपन्न



हाडोळती दि. २४(नागसेन गायकवाड): कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालयातील रासेयोचे उद्घाटन संपन्न झाले.

याबाबत अधिक माहिती अशी की, मौजे हंगरगा ता. अहमदपूर येथे कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना युवकांचा ध्यास : ग्राम - शहर विकास वार्षिक विशेष शिबिराचे उद्घाटन संपन्न झाले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आदरणीय प्रा.पी.टी. पवार उपस्थित होते. तर उद्घाटक म्हणून मौजे हंगरगा येथील सरपंच त्रिवेणीबाई रामदास पवार उपस्थित होत्या. यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ . दीपक बच्चेवार सर , ग्रामसेवक मा . मारुती गायकवाड ,तंटामुक्ती अध्यक्ष मा . जयराम श्रीराम पवार, चेअरमन मा. अंकुश पवार, सामाजिक कार्यकर्ते मा .विजय पवार, मा . शिवाजी पवार ,मा विनायक पवार हे विचार मंचावर उपस्थित होते .

यावेळी गावचे पोलीस पाटील उषा पवार व ग्रामपंचायतचे सदस्य , सोसायटीचे सर्व सदस्य , जिल्हा परिषद चे मुख्याध्यापक गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते

याप्रसंगी अध्यक्षीय समारोपामध्ये कार्यक्रमाचे अध्यक्ष मा .प्रा . पी .टी पवार साहेबांनी श्रमाचे, स्वच्छतेचे ,आरोग्याचे ,वृक्षारोपणाचे , व जलसंवर्धनाचे गावकऱ्यांना महत्त्व पटवून दिले .

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ . सादिक शेख यांनी केले . तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ . गोविंद शिळे यांनी केले .आभार डॉ . बालाजी भंडारे यांनी मानले . याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी रासेयोचे स्वयंसेवक व स्वयंसेविका बहुसंख्येने उपस्थित होते .

# कलियुगातील ईश्वरी अवतार डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज

सर्वधर्मसमभावाची शिकवण देणारे,विज्ञान व अध्यात्माची सांगड घालणारे, अंधश्रद्धेपासून समाजाला मुक्त करणारे, राष्ट्राभिमान शिकविणारे, स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठवाड्यातील पहिले एम.बी.बी.एस. डॉक्टर वयाच्या १०४ व्या वर्षापर्यंत समाजप्रबोधन करणारे, महामानव राष्ट्रसंत, वसुंधरारत्न, कलियुगातील ईश्वरी अवतार, अतुलनीय व्यक्तिमत्व, ज्यांच्या नावातच शिव आणि लिंग आहे असे प्रातःस्मरणीय, वंदनीय, आदरणीय डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज यांना जयंती दिनाच्या निमित्ताने मनःपूर्वक आप्पांच्या चरणी कोटी कोटी साष्टांग दंडवत...

या देशामध्ये जोपर्यंत सूर्य,चंद्र,तारे आहेत .तोपर्यंत आप्पांच्या महान कार्य अजरामर राहणार आहे.

पिता विश्वनाथ स्वामी व माता प्रयागबाई यांच्या पोटी गुरूवर्यांचा जन्म दि. २५ फेब्रुवारी १९१७ रोजी अहमदपूर वरवाळ राजुर येथे झाला.

वयाच्या तिसऱ्या वर्षी म्हणजे १९२० मध्ये गुरु मडिवाळ शिवाचार्य महाराज यांच्या स्वाधीन करण्यात आले तर वयाच्या विसाव्या वर्षी सन १९३७ मध्ये माघ वद्य सप्तमीला गुरुवर्य डॉक्टर शिवलिंग शिवाचार्य महाराज यांचा पट्टाभिषेक करण्यात आला.

बाळ शिवलिंग हे सद्गुरु शिवलिंग शिवाचार्य झाले. शिवाचार्य झाल्यानंतर तीनच महिन्यांनी ज्ञानप्राप्तीसाठी ते १९३७ साली रवाना झाले.

श्रावण शुद्ध प्रतिपदेपासून एकवीस दिवस आवडते क्षेत्र कपिलधार येथे पहिले अनुष्ठान केले.

आजतागायत २०२० मध्ये म्हणज काही दिवसापूर्वीच श्रावण महिन्यात ८४ वे तपोअनुष्ठान नुकतेच पार पडले आहे. प्रतिवर्षी या अनुष्ठानात कडुनिंबाचा रस व पाणी सेवन करून वाचन-लेखन,चिंतन, मनन व तपसाधना करत असत. स्वातंत्र्यपूर्व काळात म्हणजे १९४५ साली लाहोर विद्यापीठातून त्यांनी एम.बी.बी.एस. पदवी घेतली.१९४७ साली भारतीय स्वातंत्र्य संग्रामात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला व दोन वेळा तुरुंगवासही भोगला. फाळणी काळात सिंध प्रांतात संघाचे प्रसारक म्हणून कार्य केले. वैद्यकीय पदवी प्राप्त केल्यानंतरही त्यांनी जेथे आदिशक्ती पार्वती माता यांचा जन्म पर्वतावर झाला तेथे भगवान शंकराने तपश्चर्या केली अशा पवित्र स्थानी अन्नाशिवाय फळे व कंदमुळे सेवन करून अडीच वर्षाचा काळ हिमालयात व्यतीत केला हे विशेष होय.वीरशैव लिंगायत धर्माचा पाया महात्मा बसवेश्वरांनी रचला तर कळस राष्ट्रसंत डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराजांनी चढवला आहे.

बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वर सोळाव्या शतकात संत शिरोमणी मन्मथ स्वामी तर विसाव्या शतकात राष्ट्रसंत सद्गुरू डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांचे कार्य अजरामर आहे. त्यांनी लाखो भक्तांना अज्ञानाकडून ज्ञानाकडे, अधर्माकडून धर्माकडे,भक्ती कडून मुक्तीकडे, जिवाकडून शिवाकडे जाण्याचा मार्ग दाखवला. व्यक्तीची जात, कुळ, गोत्र न पाहता ज्ञानाची मुक्तहस्ताने उधळण करणारे, मानवता हा एकच धर्म आहे असे शिकविणारे, घराघरातील तीन-चार पिढ्यांना म्हणजे लाखो भक्तांना शिवदीक्षा देणारे माझे गुरु माऊली महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक राज्यातील तमाम भक्तासाठी कल्पवृक्षाची सावली आहेत. राष्ट्रसंत परमपूज्य डॉक्टर शिवलिंग शिवाचार्य महाराज अर्थात गुरुमाऊली शेवट च्या श्वासापर्यंत पर्यंत स्वावलंबी जीवन



जगले.स्वतःची सर्व कामे स्वतःच करत. स्वतःच्या हाताने बनविलेले फक्त १६ घास अन्न ग्रहण करत असत. १०४ वर्षाच्या काळात जीवन भर एक ही रूपयांचा दक्षिणा म्हणून स्वीकारला नाही.भक्ताने पुष्पहार, शाल किंवा उपहार अर्पण केला तर त्यांचा त्यांना परत करत असत. इतके ते विरक्त होते. याचे आपण सर्वजण साक्षीदार आहोत.महाराष्ट्रातील एका भक्तांनेवीस तोळ्याचा मुकूट राष्ट्रसंतांना जयंती दिनाच्या निमित्ताने अर्पण केला होता पण क्षणाचाही विलंब न लावता तो भक्ताच्या डोक्यावर अर्पण केला.

आज पर्यंत दररोज शंभर-दोनशे रुग्णांना मोफत तपासत असत. दुर्धर आजारही त्यांच्या औषधाने कमी होत. याचा हजारो भक्ताने अनुभव घेतला आहे.राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महास्वामीजींचे कार्य राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या सारखे आहे. चापोली ते कपिलधार पदयात्रा गेल्या सहा दशकांपासून काढून भजन,कीर्तन, प्रवचनाच्या माध्यमातून लोक जागृती करून समाजाला दिशा देण्याचे काम करत आहेत. अंधश्रद्धा, अस्पृश्यता, जातिभेद, मानवता, राष्ट्रभक्ती, भ्रूण हत्या, रक्तदान, वृक्षारोपण, स्वच्छता,व्यसनमुक्ती अशा ज्वलंत समस्यांना आळा घालण्याचे कार्य त्यांनी जीवनभर केले आणि ते करण्यासाठी समाजाला प्रोत्साहन देण्याचे काम केलं आहे. लाखो लोक पायी दिंडी मध्ये प्रतिवर्षी सहभागी होतात. पंढरपूर सारखंच कपिलाधार येथे राष्ट्रसंत परमपूज्य डॉक्टर शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली विविध प्रांतातून पायी दिंड्या येतात. गुरुवर्य मराठी,कन्नड, संस्कृत,हिंदी,इंग्रजी, उर्दू व पंजाबी अशा सहा भाषांतून प्रभावीपणे आपले विचार मांडत असत. अध्यात्मिक कार्या सोबतच शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य होते.

साहित्य क्षेत्रातही श्री परमरहस्य,शिवानंद बोध,स्वयंप्रकाश, वीरशैवत्कर्षण, गुरुगीता,बसवपुराण, रत्नत्रय असे त्यांचे २० ग्रंथसंपदा प्रकाशित आहेत. कर्म हीच पूजा माना आई-वडिलांची, समाजाची, रराष्ट्राची, देशाची सेवा करा. निस्वार्थी जीवन जगा. चोरी, भ्रष्टाचार करू नका. असा संदेश आपल्या प्रवचनातून, कीर्तनातून देत असत.वास्तव आणि सत्य त्यांचे बोल असल्याने त्यांच्या शब्दाला भक्तांनी प्रमाण मानले.वयाच्या १०४ वर्षापर्यंत ही त्यांची प्रकृती ठणठणीत होती. कसलाच आजार नव्हता परंतु कोणाची नजर लागली की चार दिवसातच होत्याचे नव्हते झाले. संपूर्ण महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगना, कर्नाटक पोरके झाले. सतत समाजाच्या भल्याचा विचार आपल्या कृतीतून चालू ठेवणारा एक दिप आता मालवला आहे.

राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांनी देह ठेवल्यामुळे सर्व भक्तांवर दुःखाचा डोंगर कोसळला परंतु आपण दुःखाला सावरून त्यांनी आयुष्यभर आपल्या आचरणातून, कृतीतून दिलेला विवेकाचा जागर पुढे सुरू ठेवणे गरजेचे आहे.

रामाची मुर्ती ज्या दगडामध्ये निर्माण करण्यात आली त्या निल शालीग्राम दगडामध्ये समाधी अत्यंत कलाकुसरीने अत्यंत लक्षवेधी निर्माण केलेली आहे.

राष्ट्रसंत परमपूज्य डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज संजीवन समाधी शिवलिंग प्रतिष्ठापना सोहळा विधी, धार्मिक पूजा केंद्रीय मंत्री ना. नितीन गडकरी यांच्या सह मान्यवरांच्या हस्ते दि २३ रोजी अत्यंत उत्साहाच्या वातावरणामध्ये भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये साजरा करण्यात आला.

यावेळी प्रारंभी भक्ती स्थळापासून या सोहळ्याच्या निमित्ताने वीरमठ संस्थानापासून भक्तीस्थळाचे प्रमुख आचार्य गुरुराज स्वामी, वीरमठ संस्थांचे उत्तर अधिकारी राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज, हाडोळती मठाचे मथाधीपदी अभिषेक शिवाचार्य महाराज यांची सजवलेल्या रथामध्ये शहराच्या प्रमुख मार्गावरून शोभायात्रा काढून त्यांचा समोर भक्ती स्थळावर करण्यात आला.


या सोहळ्याला महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगणा राज्यातील भाविक भक्त मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

राष्ट्रसंत परमपूज्य डॉक्टर शिवलिंग शिवाचार्य महाराज यांचा जन्म दिवस २५ फेब्रुवारी असल्याने त्यांच्या जीवनावर टाकलेला हा अल्पसा परिचय.



**रामलिंग तत्तापुरे,**
पर्यवेक्षक, यशवंत विद्यालय,
अहमदपूर ता.अहमदपूर,जि.लातूर
(महाराष्ट्र)(९७६४३३०३००)

# कबीरवाणी



**बिन रखवाले बाहिरा चिड़िये खाया खेत ।**
**आधा परधा ऊबरै, चेती सकै तो चेत ॥**

**भावार्थ :** संत कबीर म्हणतात कि, शेतामध्ये आलेल्या पिकाची जर रक्षण केले नाहीत तर चिमण्या सारे शेत खाऊन टाकतील. आताही वेळ आहे राहिलेले शेत जर वाचवायचे असेल तर सतर्क राहुन शेताचे रक्षण केले पाहिजे. बहलेल्या पिकाला वाचवले पाहिजे. जीवनामध्ये बेसावध राहीलयाने मानव खुप काही गमावुन बसतो, याची त्याला जाणीव सुद्धा होत नाही. जर माणवाने वेळीच सावधगीरी बाळगली तर भविष्यात होणारे नुकसान वाचवु शकते.

**डॉ. बालाजी कारामुंगीकर मो. ९८२३११२९०७**

यशवंत
धाराशिव जिल्हा
रविवार दि. २५ फेब्रुवारी २०२४

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

# खा. राजेनिंबाळकर यांचा आ. राणा पाटील यांच्यावर टीकास्त्र



धाराशिव दि.२४ (प्रतिनिधी) – शासकीय निधीच्या माध्यमातून मतदार संघातील विकास कामे करणे ही लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे. कोणत्याही लोकप्रतिनिधींनी जिल्ह्यामध्ये शासनाकडे पाठपुरावा करून निधी आणून विकास कामे केली तरी ती कामे मीच केली असा आव आणत असल्याची टीका खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी आ राणाजगजितसिंह पाटील यांच्यावर केली आहे.

धाराशिव शहरातील सर्व्हिस रोडसाठी मंजुर ६८ कोटीच्या कामाचे नागरीकांच्या हस्ते केलेल्या भुमीपूजन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आ कैलास पाटील, जेष्ट नेते नानासाहेब पाटील, माजी नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर, शिवसेना (ठाकरे) चे शहरप्रमुख सोमनाथ गुरव, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत पाटील, बाजार समीतीचे संचालक उमेश राजेनिंबाळकर, सतिष सोमाणी, पंकज पाटील, उपळाचे सरपंच सुरज घोगरे, मनोज पडवळ आदीसह नागरीक उपस्थित होत. डी मार्टनजीक सर्व्हिस रोड तसेच एक अंडरपास होण्यासाठी या भागातील जनतेची मागणी होती. या मागणीसाठी गेल्या ५ वर्षापासून शिवसेनेच्या नेत्यांनी पाठपुरावा केला.

मात्र भुमिपूजनाचा सोहळा सत्ताधाऱ्यांनी उरकून घेतला. त्यामुळे ज्यांनी यासाठी योगदान दिले अशा सर्वच लोकासह खासदार, आमदार व माजी नगराध्यक्ष यांचा यावेळी सत्कार केला. शिवाय स्थानिक नागरिकांच्या हस्ते त्याचे भुमिपूजन करण्यात आले. पुढे बोलताना खा राजेनिंबाळकर म्हणाले की, या महामार्गावर सर्व्हिस रोडसह अंडर पास नसल्याने अपघाताचे प्रमाण वाढले होते. शिवाय रहदारीस अडथळा येत होता. नागरिकांची मागणी लक्षात घेऊन आपण दिशा समितीमध्ये, रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीमध्ये तसेच स्वत: सबंधित खात्याचे मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन सातत्याने पाठपुरावा केला. मात्र त्यांनी निधी मंजुर झाल्यानंतर भुमिपुजनाचा कार्यक्रम घेऊन पक्षीय प्रचार केला असल्याचा गंभीर आरोप केला. तर आ कैलास पाटील म्हणाले की, शासकीय कार्यक्रमातही आता पक्षाचे झेंडे व बॅनरबाजी करुन जनतेच्या पैशाची लुट केली जात असल्याचा आरोप करीत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्यासह भाजपवर निशाणा साधला. तसेच यापुढेही या कामाबाबत काही अडचण असल्यास आम्ही ते पुर्ण करु असे आश्वासन त्यांनी दिले. तसेच मकरंद राजेनिंबाळकर म्हणाले की, स्वत:च्या तत्कालीन मतदारसंघातील प्रश्न सोडवता आला नाही. पण प्रश्न सुटल्यावर श्रेय घेण्याची त्यांची धडपड हास्यास्पद नव्हे तर लज्जास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. तर जेष्ट नेते नानासाहेब पाटील यांनीही हे कामाचा शेवटपर्यंत पाठपुरावा करणाऱ्या खा. राजेनिंबाळकर, आ पाटील व माजी नगराध्यक्ष यांनी तिघांचे अभिनंदन केले. प्रास्ताविक सोमनाथ गुरव यांनी तर सूत्रसंचालन दौलत निपाणीकर यांनी व आभार पंकज पाटील यांनी मानले.

# खा.राजेनिंबाळकर यांनी केलेल्या विकास कामांचा लेखाजोखा जनतेसमोर मांडावा – काळे




धाराशिव दि.२४ (प्रतिनिधी) – खासदार ओमराजे यांना प्रधानमंत्री मोदी यांच्यामुळे खासदारकीची खुर्ची मिळाली आहे. तर काल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते जिल्ह्यातील विविध विकास कामांचे उद्घाटन करण्यात आले. त्या कार्यक्रमास खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आ कैलास पाटील हे गैरहजर होते. गडकरींनी उद्घाटन केलेल्या कामांचे पुन्हा आज खासदार व आमदार यांनी उद्घाटन केले आहे. कृत्याचा मी जाहीर निषेध करीत असून खासदार राजे निंबाळकर यांनी जिल्ह्यात आज पर्यंत केलेल्या विकास कामांचा लेखाजोखा जनतेसमोर मांडावा असे थेट आव्हान भाजपाचे लोकसभा अध्यक्ष नितीन काळे यांनी खासदार ओमराजे व आ कैलास पाटील यांना दि.२४ फेब्रुवारी रोजी दिले आहे.

धाराशिव शहरातील प्रतिष्ठान भवन भाजप कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी भाजपाचे नेताजी पाटील, प्रदीप शिंदे, ॲड खंडेराव चौरे, प्रवीण पाठक, राजसिंह राजेनिंबाळकर, रामदास कोळगे, अभय इंगळे, इंद्रजित देवकते, आण्णा पवार आदी उपस्थित होते. पुढे बोलताना काळे म्हणाले की, जिल्ह्यात विकास कामासाठी केंद्रामधून निधी मिळाला असून त्या विकास कामाचे उद्घाटन लातूर येथील कार्यक्रमातून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी ऑनलाईन पद्धतीने केले. त्यासाठी पालकमंत्री प्रा डॉ तानाजीराव सावंत, खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार कैलास पाटील, आमदार राणाजगजितसिंह पाटील, आमदार विक्रम काळे, आमदार सतीश चव्हाण, आमदार सुरेश धस या लोकप्रतिनिधींना निमंत्रित करण्यात आले होते. मंत्री प्रा डॉ सावंत, आ चौगुले यांनी इतर कामामुळे येऊ शकत नसल्याचे सांगितले. तर आ चव्हाण व आ काळे यांनी लातूर येथील कार्यक्रमात उपस्थित राहणार असल्याचे सांगितले. मात्र खासदार राजेनिंबाळकर व आमदार पाटील यांनी या कार्यक्रमाकडे जाणून बुजून पाठ फिरवली असल्याचा आरोप केला. विशेष म्हणजे कार्यक्रम पत्रिकेमध्ये जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींची नावे तर होतीच त्याचबरोबरच कोनशिलेवर देखील त्यांचीच नावे असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र ते आले नसल्यामुळे त्यांची खुर्ची रिकामी राहिली असे सांगत ही खुर्ची मोदी यांच्यामुळे मिळाली असल्याचा टोलाही लगावला. गेल्या अडीच वर्षात मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरे यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी एखादा पत्रव्यवहार केंद्राकडे केला का याचे उत्तर द्यावे असे सांगत ते म्हणाले की, रेल्वेच्या कामासाठी फुटकी कवडी देखील दिली नसताना देखील केंद्राने दिलेल्या निधीचा तुम्ही ना पसंती करता असे म्हणत या कृतीचा त्यांनी निषेध नोंदविला.

**जिल्ह्यातील अधिकारी व ठेकेदार यांना कोणी सळो की पळो करून सोडले आहे ? याचा आम्ही लवकरच कोण कोण जनतेसमोर करणार असून तो लोकप्रतिनिधी कोण आहे हे लवकरच वेळ आल्यावर सांगितले जाईल असा इशाराही त्यांनी दिला. पूर्वी एखादा अधिकारी जिल्ह्यामध्ये येण्यासाठी ना खुश असायचा. मात्र बदली होऊन जाताना तो अक्षरशः गहिवरून जात होता. मात्र आज जिल्ह्यातील अधिकारी व ठेकेदार देखील ह्मे खोलीच्या प्रवृत्तीला वैतागून गेले असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे पाहुणे रावळ्यांच्या व नातेगोत्यांच्या माध्यमातून किती निधी काळ्या मार्गाने जमा केला आहे ? हे देखील लवकरच जनतेसमोर आणणार असल्याचे त्यांनी ठासून सांगितले.**

# १४० कोटी रुपये निर्गमित करण्याचा शासन निर्णय – आ. पाटील



धाराशिव दि.२४ (प्रतिनिधी) – मागील ५ वर्षात धाराशिव शहरातील रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झाली होती. खड्डे आणि धुळीच्या साम्राज्यामुळे त्रस्त झालेल्या धाराशिव शहरातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी शहरातील ९ मी. व त्यापुढील रुंदीच्या २५ किलो मीटर लांबीच्या सिमेंट रस्त्यांचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. या प्रस्तावास मंजूरी मिळाल्यानंतर दि.२४ फेब्रुवारी रोजी याबाबतचा शासन निर्णय निर्गमित झाला असल्याची माहिती आ राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

धाराशिव, कळंब, तुळजापूर व नळदुर्ग या शहरांतील रस्त्यांच्या सुधारणा करण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता असल्याने रस्ते व नाली विकासासाठी प्रारूप आराखडा तयार करण्याच्या सूचना संबंधित पालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना एप्रिल २०२३ मध्ये देण्यात आल्या होत्या. याबाबत धाराशिव आणि कळंब येथे पत्रकार परिषद घेवून नागरिकांना माहितीही दिली होती. धाराशिव शहरातील रस्ते व नाली बांधकामासाठी १५४ कोटींचा प्रस्ताव नगर विकास विभागाकडे सादर करण्यात आला होता. तुळजापूरसाठी १७३ तर नळदुर्गसाठी १०४ कोटींचा आराखडा देण्यात आला होता. पहिल्या टप्प्यात तुळजापूरसाठी १३९ कोटी तर नळदुर्गसाठी ९७ कोटींच्या निधीला मंजुरी देण्यात आली. तसेच धाराशिव व कळंब शहराचा विषय प्रलंबित राहिला होता. आता धाराशिव शहरासाठी १४० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून कळंबच्या प्रस्तावास देखील लवकरच मंजूरी मिळावी यासाठी पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. तर जानेवारीमध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून निधीची मागणी केली. त्यांच्या विशेष सहकार्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धाराशिवसाठी १४० कोटी रूपये मंजूर केले असल्याची माहिती आ पाटील यांनी दिली आहे. त्यामुळे शहरवासियांची गैरसोय दूर होणार असल्याचे ख पाटील यांनी नमूद केले आहे.

# भारत जोडो अमेठीच्या परिसंवादामध्ये सय्यद सहभागी



धाराशिव दि.२४ (प्रतिनिधी) – अखिल भारतीय काँग्रेसच्या वतीने राहुल गांधी यांच्या नेतृत्त्वात संपूर्ण देशभरात भारत जोडो यात्रा सुरु आहे. या यात्रेत अमेठी (रायबरेली) येथे इंडियन ओवरसीस काँग्रेसचे विदेशातील अध्यक्ष आणि देशभरातील महत्त्वपूर्ण व्यक्तींच्या उपस्थितीत परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादाकरिता धाराशिव जिल्ह्यातून धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष खलील सय्यद यांना निमंत्रित करण्यात आले होते. परिसंवादात देश-विदेशातील काँग्रेस नेत्यांनी आपले विचार व्यक्त केले. यावेळी धाराशिव येथील खलील सय्यद यांनीही काँग्रेस पक्षाची विचारधारा आणि आगामी काळात पक्षाची रणनीती याविषयी विचार मांडले. दरम्यान काँग्रेसचे युवक नेते राहुल गांधी यांच्याशी जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष खलील सय्यद यांनी संवाद साधून जिल्ह्यातील काँग्रेसच्या सद्यस्थितीबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी देशभरातील काँग्रेसचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्रम संस्कार शिबिरात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविणे महत्त्वाचे – प्राचार्य चौधरी



धाराशिव दि.२४ (प्रतिनिधी) – राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रम संस्कार शिबिरातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाची जडण घडण होत असते. त्यामुळे अशा शिबिरात विद्यार्थ्यांनी उस्त्फुर्त सहभाग नोंदविणे आवश्यक असल्याचे असे मत प्राचार्य प्रा.डॉ.प्रशांत चौधरी यांनी व्यक्त केले.

धाराशिव तालुक्यातील काजळा येथे व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रम संस्कार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी ॲड.शिरीष देशपांडे, प्रा.डॉ.विनोदकुमार वायचळ, प्रा.अशोक गोरे, प्रा.दिनकर रासवे, प्रा.डॉ.मकरंद चौधरी आदी उपस्थित होते. तर ॲड शिरीष देशपांडे म्हणाले की, महाविद्यालयीन जीवनात अशा शिबिरातूनच विद्यार्थ्यांच्या जीवनाला वेगळी दिशा मिळते, त्यांच्या कला गुणांना वाव मिळतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आयुष्यात अशा शिबिराचे महत्व हे अनन्य साधारण असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी प्रा.डॉ.विनोदकुमार वायचळ व प्रा.अशोक गोरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा.डॉ.मकरंद चौधरी यांनी तर सूत्रसंचालन कु.प्रांजली भोसले हिने व आभार प्रा.दिनकर रासवे यांनी मानले. यावेळी विद्यार्थी, प्राध्यापक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अराजपत्रीत, अधिकारी गटाची परिक्षा रद्द करुन नव्याने घ्या



धाराशिव दि.२४ (प्रतिनिधी) – जलसंधारण व मृद विभागाची अराजपत्रीत व अधिकारी गटाची परिक्षा रद्द करुन नव्याने अधिकृत टीसीएस केंद्रावर परिक्षा तात्काळ घेण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर यांनी राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्याकडे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत एका निवेदनाद्वारे दि.२३ फेब्रुवारी रोजी केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, नुकत्याच पार पडलेल्या जलसंधारण व मृद विभागाची अधिकारी गट व अराजपत्रीत पदाच्या परिक्षेत मोठ्या प्रमाणावर गोंधळ व पेपर फुटी झाल्याने अशा स्वरुपाच्या परिक्षा तात्काळ रद्द करुन नव्याने टी.सी.एस. अधिकृत केंद्रावर परिक्षा घेण्यात याव्यात. राज्यातील गोर-गरीब, होतकरु, प्रामाणिकपणे रात्रंदिवस अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समोरच परिक्षा केंद्रावर पेपर फुटी व गोंधळ बघून त्यांची मानसिकता खालावली असून विद्यार्थ्यांत याबाबत चिड निर्माण होत आहे. या पेपर फुटी व गोंधळ करणाऱ्या दोषींवर कायदेशीर कठोर कारवाई करावी व विद्यार्थ्यांच्या नव्याने परिक्षा घेण्यात याव्यात, अशी मागणी दुधगावकर यांनी केली आहे.

# कंचेश्वर कारखान्याच्या आरोग्य तपासणी शिबिरात २०४ ऊस तोड मजुरांची तपासणी



धाराशिव दि.२४ (प्रतिनिधी) – तुळजापुर तालुक्यातील मंगरुळ येथील मांजरा शुगर (कंचेश्वर) इंडस्ट्रीज प्रा.लि, या कारखान्याचा गाळप हंगाम २०२३-२४ हा सहकार महर्षी व महाराष्ट्राचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्विपणे सुरु आहे. गाळप हंगामात कामावर असलेल्या ऊस तोडणी मजुर व कारखाना कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या सहाय्याने प्राथमिक आरोग्य केंद्र, मंगरुळ व कारखान्याच्यावतीने एन.टी.पी.ई अंतर्गत मोफत क्षयरोग स्क्रिनिंग व आरोग्य तपासणी शिबीरदि.२३ फेब्रुवारी रोजी कारखाना स्थळावर आयोजन केले होते. या शिबिरात २०४ जणांनी लाभ घेतला.

तुळजापूर तालुक्यातील मांजरा शुगर (कंचेश्वर) इंडस्ट्रीज कारखान्याचा गाळप हंगाम जोमात सुरु आहे. चालू हंगामात काम करणाजया ऊस तोडणी मजुर व कारखान्यात काम करणाजया कर्मचाऱ्यांनी या मोफत आरोग्य तपासणी शिबिरात सहभाग घेवुन विविध प्रकारची तपासणी करुन घेतली आहे. यात २०४ व्यक्तींनी याचा लाभ घेवुन शिबिरास उत्स्फुर्तपणे प्रतिसाद दिला. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी व त्यांचा स्टाफ यांनी लाभार्थ्याची विविध प्रकारची तपासणी करुन प्रथोमपचारासाठी त्यांचेमार्फत औषधे वाटप केले आहे. यावेळी कारखान्याचे व्यवस्थापक सतीश वाकडे यांनी वैद्यकीय अधिकारी डॉ. यात्नाळकर, डॉ. माळी, डॉ. पाठक, डॉ. आरडे, डॉ. जाधव व त्यांचे स्टाफचा सत्कार केला. शिबिराचे आयोजन प्रसंगी कारखान्याचे व्यवस्थापक यांनी शिबिराच्या माध्यमातून मानवसेवा होत असुन आरोग्य हीच आपली खरी संपत्ती आहे, असे प्रतिपादन केले. यावेळी कारखान्याचे अजित कदम, जनरल मॅनेजर (टेक्नी.), रामानंद कदम, जनरल मॅनेजर (ॲग्री), सुंदर साळुंके, चिफ केमिस्ट, उत्तम व्हायकर, डिस्टीलरी मॅनेजर, सर्व खातेप्रमुख, विभागप्रमुख व ऊस तोडणी मजुर, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोहगाव खंडाळा प्रकल्पातील दहन भूमी शेडचे बांधकाम थांबवावे

तुळजापूर दि.२४ (प्रतिनिधी) – तालुक्यातील हंगरगा( नळ) ग्रामपंचायतीकडून इंदिरा नगर तांड्यासाठी लोहगाव शिवारातील खंडाळा प्रकल्पालगत दहनभूमी शेडचे करण्यात येत असलेले बांधकाम त्वरित थांबवण्याची मागणी निवेदनाद्वारे लोहगाव ग्रामस्थ, शेतकरी व ग्रामपंचायतवतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

तुळजापूर तालुक्यातील हंगरगा( नळ) येथील ग्रामपंचायतीकडून इंदिरा नगर तांड्यासाठी लोहगाव शिवारातील खंडाळा प्रकल्पा लगत दहन भूमी शेडचे बांधकाम करण्यात येत आहे. परीणामी दहन भूमीत अंत्यविधी केल्यानंतर अस्थी प्रकल्पात विसर्जन केल्याने व पावसाळ्यात पावसाने वारे वादळाने अंत्यविधीची अस्थी प्रकल्पत व जलयोजनेच्या विहिरीतील पाण्यामध्ये मिसळून पिण्याचे पाणी दुषित होवून नागरिकांचे आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. या प्रकल्पातून लोहगाव, नंदगाव, रामतीर्थ, अलियाबाद, बोरगाव, शिंदगाव, रामनगर, योडोळा (तांडा) हंगरगा(नळ) या ८ ते १० गावांना जलयोजने मार्फत पाणी पुरवठा होतो. यातील काही गावच्या जल योजनेच्या विहिरी आहेत. गावांना पिण्यासाठी पाणी पुरवठा होतो. असे असतानाही २ किलो मीटर अंतरावर असलेल्या इंदिरानगर तांड्यासाठी लोहगाव शिवारातील खंडाळा प्रकल्पात दहन भूमी शेड बांधण्यात येत असल्याने परिसरातील नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे. या दहन भूमी शेडचे बांधकाम तात्काळ थांबण्याची मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, तहसिलदार तुळजापूर, गट विकास अधिकारी तुळजापूर यांच्याकडे केली आहे. या निवेदनावर शेतकऱ्यांच्या व ग्रामस्थांच्या सह्या आहेत. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ दखल घेवून दहन भूमीचे काम थांबवावे अन्यथा आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

# संपादकीय

## ....सुरुवात तर झाली

सन्मानपूर्वक जागा वाटप झाल्याने अखिलेश यादव आता राहुल यांच्या न्याय यात्रेत सहभागी होणार आहेत. प्रचाराच्या दृष्टीनेही दोघांसाठी एकत्र यात्रा उपयुक्त ठरेल.

काँग्रेस आणि समाजवादी पक्षात उत्तर प्रदेशातील लोकसभेच्या जागा वाटपावर अखेर एकमत झाले. मध्य प्रदेशातही दोघे एकत्र लढणार आहेत. उत्तर प्रदेशात १७ जागा काँग्रेसला मिळाल्या आहेत. ६२ जागा समाजवादी पक्ष लढवणार आहे. एक जागा चंद्रशेखर आझाद यांच्या आझाद समाज पक्षास सोडली आहे. राहुल गांधी यांची न्याय यात्रा उत्तर प्रदेशात असतानाच हा समझोता झाल्याने विरोधी पक्षांच्या इंडिया' आघाडीसाठी आणि त्यातही काँग्रेससाठी ही खुशखबर' आहे. दिल्लीतही काँग्रेस आणि आम आदमी पक्षात जागा वाटपावर समझोता झाला आहे. यामुळे काँग्रेसला डोक्यावरील मोठे ओझे उतरल्यासारखे वाटेल. कारण निवडणूकपूर्व जागा वाटपावरच 'इंडिया'चे घोडे अडले होते. अजूनही अनेक राज्यांत स्थिती फार बदललेली नाही; पण किमान एक-दोन मुख्य राज्यांत मित्र पक्षांमध्ये एकमत होण्याने 'इंडिया' आघाडी अजून कायम आहे हे दिसले. लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्ष आपले उमेदवार निश्चित करत आहे आणि प्रमुख विरोधी पक्ष मानल्या जाणाऱ्या काँग्रेसकडून या बाबत काहीच हालचाल नाही असे चित्र होते. या समझोत्यांमुळे काँग्रेस व मित्र पक्षांच्या नेत्यांत, कार्यकर्त्यांमध्ये सकारात्मक संदेश नक्कीच जाईल. निवडणुकीला सामोरे जाण्याचा किमान हुरुप तरी त्यांना मिळेल.

**अवघड वाट...**

उत्तर प्रदेशात काँग्रेसने १९ जागांसाठी हट्ट धरला होता. समाजवादी पक्ष त्यांना ११ जागा देऊ करत होता. १७ जागा हा आमचा शेवटचा देकार आहे' असे समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी नुकतेच जाहीरही केले होते. यामुळे 'इंडिया' आघाडी येथे टिकते की नाही असा प्रश्न निर्माण झाला होता. काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी यांनी ऐनवेळी मध्यस्थी केल्याने पेच सुटला. या तहा'नुसार अमेठी, रायबरेलीसह १७ जागा काँग्रेसला मिळाल्या आहेत. अमेठीमधून दिवंगत माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी विजय मिळवला होता. राहुल यांनीही येथे विजय संपादन केला होता; पण गेल्या निवडणुकीत ते येथे पराभूत झाले होते. रायबरेली हा माजी पंतप्रधान इंदिरा गांधी व नंतर सोनिया गांधी यांचा मतदार संघ. आता अमेठीमधून राहुल पुन्हा उभे राहतात का? रायबरेलीमधून प्रियांका लढणार का? या विषयी उत्सुकता आहे. अखिलेश यांनी वाराणसीची जागा काँग्रेसला दिली', हे त्यांचे मैत्रीपूर्ण वर्तन आहे की, धूर्त राजकीय खेळी ते समजत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा मतदार संघ आहे. तेथे आपला उमेदवार पडलेला बघण्यापेक्षा काँग्रेसच्या गळ्यात ते अपयश बांधावे असाही विचार त्यामागे असेल. मुझफ्फराबादचा आग्रह काँग्रेसने सोडला असला तरी मथुरेत त्यांच्या समोर हेमा मालिनी यांचे आव्हान कडवे असेल. काँग्रेसने मध्य प्रदेशात खजुराहोची जागा समाजवादी पक्षास दिली आहे. काँग्रेस उरलेल्या सर्व जागा लढवणार आहे. दिल्लीतील सातही जागा आप' लढवेल असे पक्ष प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी जाहीर केले होते. काँग्रेस पाच जागा मागत होता. अखेर काँग्रेसला तीन जागा मिळाल्या आहेत. चंडीगढच्या महापौर पदाच्या निवडणुकीत युतीला मिळालेल्या यशाने बहुधा दोघांत दिल्लीविषयी एकमत झाले असावे. त्या बदल्यात गुजरातमधील दोन जागा काँग्रेस आप'ला देणार आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला उत्तर प्रदेशात व मध्य प्रदेशात प्रत्येकी अवघी एक जागा मिळाली होती. दिल्लीत त्यांना खातेही उघडता आले नव्हते. देशात कोठेही लढायचे असेल तर त्यांना अन्य पक्षांची मदत घेणे भाग आहे. मध्य प्रदेशात आपला पक्ष पूर्ण ताकदीने पाठिंबा देईल असे आश्वासन अखिलेश यांनी काँग्रेसला दिले आहे. मात्र पंजाबबाबत आप' व काँग्रेस यांच्यात अजून एकवाक्यता नाही. नितीश कुमार आणि राष्ट्रीय लोक दलाचे जयंत चौधरी यांनी भाजपशी हातमिळवणी केल्याने काँग्रेस व 'इंडिया'ला धक्का बसला होता. जागा वाटपाच्या ताज्या समझोत्यांमुळे दोघांमध्येही आशा निर्माण झाली असेल. त्यांच्यासाठी हेही नसे थोडके' अशी स्थिती आहे.

**ज्यांच्या शोधामुळे जगाची जगण्याची दिशा बदलली असे जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ यांची नवीन अभ्यासू पिढीला माहिती व्हावी व त्याद्वारे प्रेरणा मिळावी या हेतूने संक्षिप्त स्वरुपात दरदिवशी किंवा सोईप्रमाणे एका शास्त्रज्ञांची माहिती आम्ही प्रकाशित करीत आहोत. यासंदर्भात आपली प्रतिक्रिया आपेक्षित आहे.**

– संपादक **यशवंत** लातूर

## डॉ. खानखोजे ३१



करितो सन्मित्र हो, निश्चये आपणापुढे या पणा ।
खर्चिन ह्या देहास देशकार्थी, मी जे रूचे आपणा ।।

अशी बालपणीच तेजस्वी प्रतिज्ञा करणाऱ्या कृषितज्ज्ञ डॉ. पांडुरंग सदाशिव खानखोजे यांचा जन्म महाराष्ट्रातील वर्धा या शहरातला. तेथील शालेय व कॉलेज शिक्षणानंतर कॅलिफोर्निया विद्यापीठात त्यांनी कृषिशास्त्र विभागात प्रवेश घेतला. तेथून काही काळ शिक्षण खंडित करून मिलिटरी अॅकॅडमीचे डिप्लोमा शिक्षण त्यांनी सन राफाएलला पूर्ण केले व खानखोजे क्रांतिकार्याकडे वळले. जे भारतीय स्वातंत्र्य चळवळीपासून दूर आहेत त्यांच्यात क्रांतिकार्याचा विचार रुजवण्यासाठी सुट्ट्यांच्या कालावधीत ते काम करू लागले.

शिक्षण व क्रांतिकार्य यासाठी व उदरनिर्वाहासाठी लागणारा पैसा त्यांनी श्रमाने, स्वावलंबनाने उभा केला पण कोणाकडे हात पसरले नाहीत. रेल्वेमार्गावर खडी टाकणे, शेतात मजुरी करणे, फळबागात राबणे, दारू दुकान स्वच्छ करणे अशी मिळेल ती कामे करून परदेशातील कॅलिफोर्निया, सिआटल, कॅनडा, जपान इत्यादी शहरांमधून स्वतःला सिद्ध करीत शैक्षणिक व क्रांतिकार्याची त्यांनी श्रेणी उंचावली.

एका छोट्या सुटीत सान फ्रान्सिस्कोला जाऊन खानखोजेंनी 'भारतीय स्वातंत्र्य संघाची' स्थापना केली. भारतातील अनुशीलन समिती, आर्य बांधव समाज, पंजाबातील क्रांतिकारक यांच्याशी खानखोजेंचा संबंध होता. हा तरुण भारतीय स्वातंत्र्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन क्रांतिसेना उभारण्याचे सैनिकी शिक्षण घेतो आणि भारतात आधुनिक कृषि विद्या रुजवण्यासाठी धडपडतोय याचे अनेक नेत्यांना खूप कौतुक वाटले.

पुढे खानखोजेंनी 'दुर्जल कृषि' (कोरडवाहू शेती) कमी पावसाच्या प्रदेशात कोरडवाहू शेती यशस्वी करण्याची विद्या या विषयामध्ये एम. एस. पदवी संपादन केली. या अभ्यासाने खानखोजेंची पारंपरिक शेतीविषयीची मते बदलू लागली. नव्या पद्धती, आधुनिक अवजारे, योग्य खते, गोवंश सुधार, पशुपालन, पीक, पाणी, कृषिशाळेवर त्यांची नेमणूक केली. तेथील मुख्य अन्न मका यावर विपुल संशोधन करून एकेका मक्याच्या ताटावर तीस-तीस कणसांची नवनिर्मिती केली. त्यामुळे मेक्सिकन सरकारने पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. शेवग्याचा पाला, मुळ्या, बिया यांचेही महत्त्व तेथील शेतकऱ्यांना त्यांनी पटवून दिले. खानखोजेंच्या प्रयत्नामुळे कमी वेळात जास्त व चांगले काम होऊ लागले. शेतमजुरांची कमाई वाढली. ग्रामोद्योग, ग्रामविकासातून शेतीचे यांत्रिकीकरण वाढीस लागले. भारतात जाऊन ब्रिटिशांच्या तुरुंगात राहण्यापेक्षा त्यांनी मेक्सिकोत कृषिकार्य करून मानवसेवा केली. मेक्सिको व ग्वाटेमाला येथील रबर पैदास वाढविण्याची त्यांनी कामगिरी केली. दक्षिण अमेरिकेला रबर लागवडीसाठी उद्युक्त करणारा आणि वनस्पतीपासून 'हार्मोन्स' मिळवून देऊन मानवी गरज भागवणारा शास्त्रज्ञ, असा त्यांचा बोलबाला झाला. खानखोजेंनी प्रयोगाअंती मध्वालू या जंगली कंदापासून हार्मोन्स मिळवली. याही शोधाला तिकडे खूप मान्यता मिळाली. भारतात आल्यावर नागपूर आकाशवाणीवरून त्यांनी ६०/७० शेतीविषयक भाषणे दिली. शेतीविषयक अनेक लेख लिहिले पण त्यांना पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नव्हता. मेक्सिकोत जे करून दाखवलं ते इथं काही करता येत नव्हतं याचंच त्यांना विलक्षण दुःख होतं. सेवेची संधी शोधत श्रमप्रतिष्ठा, श्रमसंस्कृती, विज्ञान निष्ठा यांचा जमेल तसा ते प्रसार करत राहिले. अशा या ध्येयनिष्ठ, कर्तबगार देशभक्त पण उपेक्षित कृषितज्ज्ञाचे १८ जानेवारी १९६७ मध्ये निधन झाले.

# निर्हेतुक कर्मात भगवंत

अध्यात्म : ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज

खरोखर, आज आपल्याला आपले अंतरंग ओळखण्याची खरी गरज आहे. सत्कर्म असो किंवा दुष्कर्म असो, हेतूवर सर्व काही अवलंबून असते. पुष्कळ पुण्यकर्मे केली आणि काही तरी विषयाचा हेतू मनात धरला, तर काय उपयोग!

काबाडकष्ट खूप केले, बायकोपोरे टाकून बाह्यांगाने कितीही केले, तरी मन जोपर्यंत तिथे नाही, तोपर्यंत राम नाही भेटणार. मनाला भगवंताची तळमळ लागली तरच त्याचा उपयोग. निर्हेतुक कर्मात भगवंत असतो, म्हणून आपली कर्मे तशी करावीत.

खरे पाहता प्रापंचिकाएवढे काबाडकष्ट साधकाला, पारमार्थिकाला नसतात. प्रपंचाच्या काबाडकष्टांपेक्षा निम्म्याने जरी भगवंताकरिता केले तरी खूप फायदा पदरात पडेल. ज्या स्थितीत भगवंताने आपल्याला ठेवले त्या परिस्थितीतून त्याला ओळखणे सहज शक्य आहे. पण आपण विषयाकडे दृष्टी ठेवून कर्मे करतो आणि भगवंत भेटत नाही म्हणून दु:खी होतो, याला काय करावे? दैत्यदानवांनी भगवंताची तपश्चर्या केली आणि समर्थांनीही केली; दानवांनी हेतू धरून केली त्यामुळे त्यांना हेतूचा, विषयाचा लाभ झाला; परंतु भगवंत अंतरला; याउलट, समर्थांना भगवंताशिवाय दुसरा कशाचाही लाभ नको होता. त्या लाभातच त्यांनी सर्वस्व मानले.

उत्कट प्रेमामुळे भगवंताचा ध्यास लागतो. भगवंताला पाहून तू भेटलास, आता मला काही नको', अशी वृत्ती झाली पाहिजे, तरच मीपणा मरेल. भगवंताचा हात तर पुढे आहेच; आपलाच हात त्याच्यापर्यंत पोहोचत नाही.

बुद्धीपेक्षा आणि पैशापेक्षा सदाचरणाचे वजन जास्त असते. सदाचरण असून भगवंताची निष्ठा असेल आणि आहे त्या परिस्थितीत समाधान ठेवण्याची सवय असेल, तर प्रापंचिक सुख लाभते. सुख हे कुठून उत्पन्न करायचे नसून ते आपल्या वृत्तीमध्येच असते. मी' भगवंताचा आहे, तसेच सर्वजण' भगवंताचे आहेत, म्हणून भगवंतावर प्रेम केले की सर्व जगावर प्रेम बसेल.

ज्याप्रमाणे भगवंताच्या प्रसादामध्ये एखादा कडू बदाम आला तरी तो आपण खातो, त्याप्रमाणे भगवंताने एखाद्या वेळी दु:ख दिले, तर ते आनंदाने सोसायला पाहिजे. चिकित्सा थोडी बाजूला ठेवून भगवंताचे आपण स्मरण करावे. अंत:करणाची शुद्धी नामाशिवाय नाही होणार. नामापरते काही नाही हे एकदाच ज्याच्या मनाने घेतले त्याला दुसरे काही सांगावे लागत नाही. मीठ म्हणून जरी साखर खाल्ली तरी साखरेची गोडी आल्याशिवाय राहत नाही; त्याप्रमाणे कोणत्याही परिस्थितीत जरी नाम घेतले तरी ते आपल्याला तारकच ठरेल यात शंका नाही.तात्पर्य : ज्याच्यामागे उपासनेचा जोर आहे, तोच जगात खरे काम करतो.

# अमेरिकेत बटाटे अडीचशे रुपये किलो!



देशातील जवळपास सर्वच घरांमध्ये भाजीसाठी बटाट्याचा वापर केला जातो. देशासह परदेशांतही भाजीसाठी तसेच विविध पदार्थ तयार करण्यासाठी बटाट्यांचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. पश्चिम उत्तर प्रदेशमध्येही बटाट्याची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. दरम्यान, भारतात दहा ते ४० रुपये किलो दराने मिळणाऱ्या बटाट्याची अमेरिकेत किंमत प्रति किलो अडीचशे रुपये आहे!

बटाट्याची किंमत ही त्याच्या प्रकारावर आणि आकारावर अवलंबून असते. त्यामुळे बाजारात वेगवेगळ्या दराचे बटाटे मिळतात. सर्वसाधारणपणे, प्रत्येक घरात आणि प्रत्येक खाद्यपदार्थाच्या दुकानात बटाटे वापरले जातात. बटाट्याची किंमत बहुतांश भागांमध्ये दहा ते चाळीस रुपये प्रति किलो आहे. एका अहवालानुसार, सध्या अमेरिकेत एक किलो बटाट्याची किंमत ३.०१ डॉलर्स म्हणजे सुमारे २५० रुपये प्रति किलो आहे. साधारणपणे आपल्याकडे वर्षभर बटाटा खाल्ला जातो. कारण त्याची किंमत कमी असते. सध्या किरकोळ बाजारात बटाट्याची किंमत २० ते २५ रुपये प्रति किलो आहे. वर्षभर जास्तीत जास्त ३० ते ५० रुपये किलो या दराने बटाटे विकले जातात; पण अमेरिकेत बटाट्याची किंमत मोठ्या प्रमाणात वाढली आहे. बटाट्याचे लाल, पांढरा, पिवळा आणि जांभळा असे प्रमुख प्रकार आहेत. प्रत्येक प्रकारच्या बटाट्याची किंमत वेगळी आहे. एका अहवालानुसार, लाल बटाटे सर्वांत स्वस्त आहेत तर जांभळे बटाटे सर्वांत महाग आहेत. भारत जगातील अनेक देशांना अन्नधान्यासह फळे भाजीपाल्याची निर्यात करतो. सर्वच प्रकारच्या उत्पादनांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मागणी आहे. भारतातील देशी बटाट्यांना परदेशात विशेष मागणी आहे. देशी बटाट्यांमुळे परदेशी लोकांमध्ये देशाची एक खास ओळख निर्माण झाली आहे. भारताच्या एकूण बटाटा उत्पादनात सहा राज्यांचा ९० टक्के वाटा आहे. भारतीय देशी बटाटे श्रीलंका, ओमान, इंडोनेशिया, मलेशिया, मॉरिशस अशा अनेक देशांमध्ये निर्यात केले जातात. उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार, गुजरात, मध्य प्रदेश आणि पंजाबच्या शेतकऱ्यांनी बटाटा उत्पादनात सर्व विक्रम मोडीत काढले आहेत. या सहा राज्यांमध्ये ९० टक्के उत्पादन होते. बटाटा उत्पादनात उत्तर प्रदेश अव्वल स्थानावर आहे. या राज्यात २९.६५ टक्के शेतकरी बटाट्याचे उत्पादन घेतात. पश्चिम बंगालमध्ये २३.५१ टक्के, बिहारमध्ये १७.२ टक्के, गुजरातमध्ये ७.०५ टक्के आणि मध्य प्रदेशमध्ये ६.६८ टक्के तर पंजाबमध्ये ५.३२ टक्के शेतकरी बटाट्याचे उत्पादन होत आहे.

# शहरी भागात बेरोजगारी कमी?




देशात हळूहळू बेरोजगारीचा दर कमी होत आहे. सांख्यिकी मंत्रालयाने एक लेबर फोर्स सर्व्हे' प्रसिद्ध केला आहे. यामध्ये दिलेल्या माहितीनुसार, भारतातील शहरी भागात बेरोजगारीचा दर झपाट्याने कमी होत असल्याचे म्हटले आहे. ऑक्टोबर ते डिसेंबर २०२३ या कालावधीत शहरी भागातील १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या लोकांमधील बेरोजगारीचा दर ६.५ टक्क्यांवर घसरला. २०२२ मध्ये हा आकडा ७.२ टक्के होता. बेरोजगारीचा दर पुरुषांबरोबरच महिलांमध्येही कमी झाला आहे. मंत्रालयाने केलेल्या सर्वेक्षणानुसार शहरी भागात लोकांना जास्त काम मिळत आहे. मंत्रालयाने एप्रिल २०१७ मध्ये हे सर्वेक्षण सुरू केले होते. याद्वारे, श्रमशक्तीचा डेटा प्रत्येक तिमाहीमध्ये उपलब्ध करून दिला जातो. यामध्ये १५ वर्षांवरील लोकांचा समावेश आहे.

नुकत्याच झालेल्या सर्वेक्षणानुसार, पुरुषांचा बेरोजगारीचा दर ऑक्टोबर-डिसेंबर २०२२ मधील ६.५ टक्क्यांवरून ऑक्टोबर-डिसेंबर २०२३ मध्ये ५.८ टक्क्यांवर आला. याच कालावधीत महिलांचा बेरोजगारीचा दर ९.६ टक्क्यांवरून ८.६ टक्क्यांवर घसरला. दरम्यान, कामगार ते लोकसंख्येचे प्रमाण (डबल्यूपीआर)चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीमध्ये ४६.६ टक्क्यांपर्यंत वाढले. वर्षभरापूर्वी याच काळात हा आकडा ४४.७ टक्के होता. पुरुषांसाठी डब्ल्यूपीआर ६८.६ टक्क्यांवरून ६९.८ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. महिलांसाठी हाच आकडा २०.२ टक्क्यांवरून २२.९ टक्के झाला आहे.

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२३ तिमाहीमध्ये सर्वेक्षणासाठी ४४,५४४ कुटुंबे आणि १.६९ लाख लोकांकडून डेटा गोळा करण्यात आला. शहरी भागात बेरोजगारीचे प्रमाण कमी होत आहे. जुलै-सप्टेंबर २०२३ तिमाहीसाठी कामगार दल सर्वेक्षण डेटा नोव्हेंबरमध्ये प्रसिद्ध करण्यात आला. त्यानुसार बेरोजगारीचा दर ६.६ टक्क्यांवर आला होता. दरम्यान,बेरोजगारीचा हा दर पुरुषांबरोबरच महिलांमध्येही कमी झाल्याची माहिती या अहवालामध्ये देण्यात आली आहे. कोरोना संकटाच्या काळात कडक टाळेबंदी लागू करण्यात आली होती. त्यामुळे एप्रिल ते जून २०२० या तिमाहीत एकूण बेरोजगारीचा दर २०.९ टक्क्यांच्या उच्चांकावर पोहोचला होता. यामुळे देशभरातील रोजगाराच्या संधींबाबत चिंता निर्माण झाली होती. १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या पुरुषांसाठी डिसेंबर तिमाहीत बेरोजगारीचा दर ५.८ टक्क्यांपर्यंत घसरला. जुलै-सप्टेंबर या कालावधीत तो सहा टक्के, तर ऑक्टोबर-डिसेंबर २०२२ तिमाहीमध्ये तो ६.५ होता.

## राशी भविष्य



२५ फेब्रुवारी २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व
आपण केलेल्या कार्यामुळे स्वत:ला फायदा होईलच त्या बरोबर समाजाचा देखील फायदा होईल. जमीन, वहान, मशनरी संबंधीत चांगले योग आहेत. परिवारात वाद करू नका. ईश्वराविषयी श्रद्धा वाढेल.

वृषभ : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर
समाजात आपल्या कामाची स्तुती होईल. धार्मिक कामाकडील ओढा वाढेल. ओळखीचा फायदा होईल. घर, जमीन विकत घेण्याचा योग आहे. डोळ्याचा आजार संभावतो.

मिथुन : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पूर्व
मित्रांच्या सहकार्याने फायदा होईल. स्थावर प्रकरणाचा निकाल आपल्या बाजूने राहील. संत लोकांचा सहवास लाभेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

कर्क : शुभ रंग:लाल, शुभ दिशा: उत्तर
मान सन्मान वाढणार आहे. कार्यात येणारे विघ्न दूर होतील. बाहेरच्या लोकांमुळे फायदा होईल. जोखमीचे कामे करू नका.

सिंह : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण
अचानक यश मिळाल्याने मन प्रसन्न राही. कौटुंबिक समस्या हल होतील. आपल्या वाईट व्यसनांपासून दूर रहा.अनावश्यक खरेदी होईल.

कन्या : शुभ रंग:काळा, शुभ दिशा:दक्षिण
महत्वाची कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. एकद्या व्यक्तीच्या सहवासामुळे आपल्या जीवनात बदल घडून येईल. जीवनसाथी बरोबर प्रेमळपणे वागा.

तुळ : शुभ रंग: निळा, शुभ दिशा:पूर्व
कामामध्ये यश न मिळाल्याने निराशा येईल. कोणाच्याही मदतीची अपेक्षा करू नका. नवीन संधी मिळणार नाही. कौटुंबीक वातावरण सामन्य राहील.

वृश्चिक : शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पूर्व
शुभ बातम्या कळाल्यामुळे दिवस चांगला जाईल. राजकारणापासून दूर रहा. पारिवारीक समस्या सुटतील. प्रवास सुखकारक होईल.

धनु : शुभ रंग:गुलाबी,शुभ दिशा:दक्षिण
सामान्य स्तरावरचे कामे होतील. योजना सफल राहतील. समाजात यश आणि प्रतिष्ठा वाढेल. दिखाव्यापासून दूर रहा. व्यापारात, नोकरीत लाभदायक योग आहे.

मकर : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर
फायदेशीर प्रेरणा मिळणार आहे. शुभ कार्यात सामील होण्याचा योग आहे. आर्थिक खर्च वाढणार आहे. व्यापार व्यवसाय चांगला चालेल.

कुंभ : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:उत्तर
कामामध्ये यश न आल्यामुळे आपल्याला चिंता सतावेल. भाऊ, मित्र यांच्या बोलण्यामुळे मन दुखावेल. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता असून उत्पन व खर्च बरोबरीने राहील.

मीन : शुभ रंग:लाल,शुभ दिशा:उत्तर
शुभ कार्याला सुरूवात करण्याचे योग आहेत. मनस्थिती चंचल होऊ देऊ नका. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. वाईट व्यसनांपासून दूर रहा. प्रवास टाळा.

२३ फेब्रुवारीला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर चंद्र, गुरू, बुध व नेपच्यूनचा प्रभाव आहे. तुमची बाुध्दि अतिशय तल्लख आहे. त्यामुळे अनेक बाोध्दिक क्षेत्रात तुम्ही सहजगत्या संचार करू शकता. तर्कशुध्द यात्किवादाचा वापर ही तुमची जमेची बाजू आहे. कुठलीही गोष्ट बुध्दीला पटल्याखेरीज ती स्वीकारण्याची तुमची तयारी नसते. अनेक व्यक्तीबाबत तुम्हाला मनापासून आपुलकी प्रेम वाटते व त्यांची दु:खे दूर करण्यासाठी तुम्ही झटत असता. सेवाभावी संस्थामध्ये विनावेतन काम करायला तुम्हाला आवडते. समाजाची प्रगती केवळ ऐहिक गोष्टीतच नसून त्यांना नीतीमूल्यांचा संदेश देण्यासाठी तुम्ही प्रयत्नशील रहाता.

जास्त विचार करीत बसल्यास मन:ास्थिती द्विधा होण्याचा संभव जास्त आहे. एकदा बुध्दीला पटल्यावर काय तो निर्णय घ्या व तो अमलात आणा. बुध्दी व भावना दोघांचाही उपयोग करा. मज्जासंस्थेचे विकार तुम्हाला लवकर होऊ शकतात. अति बाौध्दिक श्रमांचा ताण मेंदूवर, आतड्यावर पडणार नाही याची काळजी घ्या.

कार्यक्षेत्र : तुमच्या कुशल व तल्लख बाुध्दिमत्तेच्या जोरावर तुम्ही बँक, सहकारी पतपेढ्या, महानगरपालिका यासारख्या संस्थात महत्वाचे पद प्राप्त करून घेऊ शकता. आकडेवारीवरील प्रभुत्व तुम्हास हिशोब तपासनीसासारख्या व करसल्लागारांसारख्या व्यवसायातही प्रतिष्ठा मिळवून देईल. टेलिफोन, दूरसंचार, मालवाहतूक, पर्यटनसंस्था ही तुमच्या अनुरूप क्षेत्रे आहेत व तेथे तुमचा उत्कर्ष लवकर होईल. उत्पादनाच्या एजन्शी, प्रवासी तिकिट विक्री, घरपोच सेवा ही क्षेत्रेही अनुकूल आहेत.

प्रणयी जीवन : आपला जीवनसाथी निवडतांना तुम्ही त्याची वैचारिक पातळी, व्यासंग यांना महत्व देता. केवळ शारीरिक सुखांच्या मागे धावणाऱ्या व्यक्ती तुम्हास फारशा आवडत नाहीत. उतावळ्या, भावनाशील व्यक्तींकडेही तुम्ही जराशा संशयानेच बघता. पण जीवनात बुध्दीइतकेच भावनेलाही महत्व आहे हे विसरू नका. या दृष्टीने पूरक जोडीदार तुम्हाला जून २१ ते जुलै २० दरम्यानच्या व्यक्तीत आढळेल. भावजीवन समृध्द होईल.

वर्षफळ : हे वर्ष नोकरीत व्यवसायात आपला दबदबा निर्माण करण्यास अनुकूल आहे. व्यासंगामुळे, अनुभवसंपन्नतेमुळे, सहकारी वेळप्रसंगी वरिष्ठही तुमचा सल्ला घेतील. जानेवारीत आर्थिक पातळी उंचावेल कार्यालयात मानाची जागा मिळण्याचा योग मार्चमध्ये आहे. एप्रिलमध्ये मुले उज्वल यश संपादन करतील. सप्टेंबर मध्ये केलेले जमीन जागेचे व्यवहार अधिकार लाभदायक ठरतील. डिसेंबर मध्ये आकर्षक, प्रभावी व्यक्तीचा जीवनातील प्रवेश ास्थित्यंतर घडवील.

महत्वाचे वर्ष : ५, १४, २३, ३२, ४१, ५०, ५९, ६८, ७७, ८६.

भाग्यरत्न : पाचू

याच तारेखेची व्यक्ती : गाडगेमहाराज, शेक्सपीअर

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, धाराशीव कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ९८०२२८२४०(अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही) संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.एन.जे. चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१४४/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Chandrakant Madhavrao Patil हे दिनांक १०.११.२०२३ रोजी At. Tipral येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार

1) Lata W/o. Chandrakant Patil,Age-55, Occu-H.H.
2) Gajanan S/o. Chandrakant Patil, Age- 35, Occu- Agri.
Both R/o. Tirpal, Tq.Shirur Anantpal, Dist.Latur

यांनी खालील नमूद हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Lata W/o. Chandrakant Patil | 55 | Wife |
| 2) | Gajanan S/o. Chandrakant Patil | 35 | Son |

अर्जदार याने Chandrakant Madhavrao Patil या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Chandrakant Madhavrao Patil यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांकः २३/०२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः ०४/०४/२०२४

आदेशावरुन

(ए.आर. गायकवाड) कनिष्ठ लिपिक, ३ रे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

(एस.एम.शेटे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.एन.जे. चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १४१/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Illahi S/o Maulasab Sayyed हे दिनांक ०३.०१.२०२४ रोजी At. Malkapur, Tq.Udgir येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार

1) Kashimabi W/o. illahi Sayyed, Age 60, Occu- H.H.
2) Sayyed Shadul S/o. illahi, Age 45, Occu- Labour
3) Sayyed Baba S/o. illahi, Age 38, Occu- Labour
4) Sayyed Ahmed S/o. illahi, Age 42, Occu- Labour
5) Sayyed Mansur S/o. illahi, Age 35, Occu- Labour
6) Sayyed Fayaj S/o. illahi, Age 32, Occu- Labour
7) Razia W/o. Mustafa Sharwale, Age 24, Occu- H.H.
All R/o Kranti Nagar, Malkapur, Tq.Udgir Dist.Latur
8) Malanbi W/o. Lakhim Shaik, Age 60, Occu- H.H.
R/o Shivankhed, Tq.Ahmedpur, Dist.Latur

यांनी खालील नमूद हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Kashimabi W/o. illahi Sayyed | 60 | Wife |
| 2) | Sayyed Shadul S/o. illahi | 45 | Son |
| 3) | Sayyed Baba S/o. illahi | 38 | Son |
| 4) | Sayyed Ahmed S/o. illahi | 42 | Son |
| 5) | Sayyed Mansur S/o. illahi | 35 | Son |
| 6) | Sayyed Fayaj S/o. illahi | 32 | Son |
| 7) | Razia W/o. Mustafa Sharwale | 24 | Daughter |
| 8) | Malanbi W/o. Lakhim Shaik | 25 | Daughter |

अर्जदार याने Illahi S/o Maulasab Sayyed या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Illahi S/o Maulasab Sayyed यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांकः २३/०२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः ३०/०३/२०२४

आदेशावरुन

(ए.आर. गायकवाड) कनिष्ठ लिपिक, ३ रे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

(एस.एम.शेटे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## जाहिरनामा
## दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ४५ /२०२३ निशाणी क्र. १५

अर्जदार नामदेव रविंद्र पांचाळ ज्यापेक्षा वडील नामे रविंद्र मुरहरी पांचाळ हे दिनांक ०४/१०/२०१७ रोजी कमालवाडी ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | नामदेव रविंद्र पांचाळ | २८ | मुलगा |
| २) | सत्यवान रविंद्र पांचाळ | २६ | मुलगा |
| ३) | सुमन भ्र. रविंद्र पांचाळ | ४८ | पत्नी |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक २३/०२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : २६/०२/२०२४

आदेशावरुन

(आर.टी.शिंदे) व.लिपिक — शिक्का — (पी.एम. नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)






## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.जे.सी.गुप्ता, सह दिवाणी न्यायालय क. स्तर, उदगीर यांच्या न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १४८/२०२४ निशाणी क्रमांक ०६

ज्याअर्थी नामे Vyankat S/o Dhondiba Holsambre हे दिनांक १२.०१.२००४ रोजी At. Multispecilty Hospital, Udgir Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार

1) Laxmibai W/o. Vyankat Holsambre, Age 60 yrs, Occu. H.H.
2) Ram Vyankatrao Holsambare, Age 39 yrs, Occu. Service,
Both R/o. Gudsur Tq.Udgir Dist.Latur
3) Rajshree W/o. Maroti Malwade, Age 50 yrs, Occu. H.H.,
R/o. Kumtha (bk) Tq.Ahmedpur Dist. Latur
4) Jijabai W/o. Umakant Kadam, Age 43 yrs, Occu. H.H.,
R/o Hipparga (Shaha) Post. Kurula Tq.Kandhar Dist.Nanded

यांनी खालील नमूद ४ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Laxmibai W/o. Vyankat Holsambre | 60 | Wife |
| 2) | Ram Vyankatrao Holsambare | 39 | Son |
| 3) | Rajshree W/o. Maroti Malwade | 50 | Daughter |
| 4) | Jijabai W/o. Umakant Kadam | 43 | Daughter |

अर्जदार याने Vyankat S/o Dhondiba Holsambre या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Vyankat S/o Dhondiba Holsambre यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांकः २२/०२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः १०/०४/२०२४

आदेशावरुन

(कु.ए.व्ही.चामवाड) कनिष्ठ लिपिक, सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

(एस.एम.शेटे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

ताबा नोटीस नमुना झेड

## दि उदगीर अर्बन को.ऑप.बँक लि., उदगीर

नियम १०७ (११) ड-१ पहा

### स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस

ज्या अर्थी मला प्राप्त अधिकारानुसार मी ए.आर.चौधरी, वसुली अधिकारी, दि. उदगीर अर्बन को.ऑप. बँक लि. उदगीर म.स.सं.नियम १९६१ अन्वये मागणी नोटीस १०७ (३) अन्वये थकबाकीदार यांना देवून नोटीसीमध्ये नमुद केलेली रक्कम भरण्यास बजावले असताना त्यांनी रक्कम जमा करण्यास कसूर केला आहे.

खाली सही करणाऱ्याने सदरच्या स्थावर मालमत्ता जप्त करण्यात आलेल्या असून त्याचा पंचनामाही बँकेच्या दप्तरी उपलब्ध आहे. ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे ऋणकोला याप्रोणे हणजेच नोटीस देण्यात येते की, खालील निर्दिष्ठ केलेल्या स्थावज्ञार मालमत्तेचा खाली सही करणाऱ्या अधिकाऱ्याने म.स.सं.नियम १९६१ मधील नियम १०७ (११) (ड) १ नुसार मिळालेल्या अधिकारान्वये रितसर ताबा घेतलेला आहे. विशेष करुन ऋणकोस व तमाम नागरीकांना या नोटीसीद्वारे सावध करण्यात येते की, हया स्थावर मालमत्तेच्या संदर्भात कोणतीही खरेदी विक्री, गहाण, दान, टाच, बोजा किंवा इतर हक्कात व्यवहार करु नये आणि व्यवहार केल्यास तो दि उदगीर अर्बन को ऑप. बँक लि. उदगीर यांच्या एकत्रित बोजाची रक्कम व त्यावरील होणारे पुढील व्याज यांच्या कायदेशिररित्या अधिन रहावे लागेल याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | कर्जदाराचे/सहकर्जदार/ जामीनदाराचे नांव | वसुली दाखला क्रमांक व दिनांक | मागणी नोटीस दिनो | रक्कम रुपये | स्था. मालमत्ता जप्तीचा/ ताब्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | कर्जदार- १. भक्ती डोअर पार्ट अनिता स्वप्नील पिलाजी रिंग रोड लातूर २. स्वप्नील सूधीर पिलाजी रिंग रोड लातूर ३. धर्मराज योगीराज भारती रिंग रोड लातूर ४. खोबरे सूजाता उमाशंकर मु.ो. वरटी पो. हरंगुळ | १९०/२०२३-२४ दिनांक १९/०७/२०२३ | ०१/०८/ २०२०२३ | ८१९६८१४/- व्याज खर्च | २७/१०/२०२३ |
| ०२ | कर्जदार १. भक्ती डोअर पार्ट अनिता स्वप्नील पिलाजी रिंग रोड लातूर २. स्वप्नील सूधीर पिलाजी रिंग रोड लातूर ३. धर्मराज योगीराज भारती रिंग रोड लातूर ४. खोबरे सूजाता उमाशंकर मु.पो. वरवटी पो. हरंगुळ | १९१/२०२३-२४ दिनांक १९/०७/२०२३ | ०१/०८/ २०२३ | १५८५९७५५ व्याज खर्च | २७/१०/२०२३ |

नं. ६६३/२०१५ दिनांक ०५/०२/२०१५ अन्वये गहाणखत करुन दिलेली आहे व सदरच्या मिळकती हया ग्रामपंचायत मिळकतीतील असून ज्याची चतु:र्सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस : खूली जागा पश्चिमेस : प्लॉट नं. १२ व १३
दक्षिणेस : १२ मीटर रोड उत्तरेस : जगताप यांची जमीन

२) ऋणको/कर्जदार श्री.भक्ती डोअर पार्ट अनिता स्वप्नील पिलाजी यांच्या मालकी व ताब्यातील कन्हेरी हद्दीतील मिळकत शॉप नं. १ एम.सी. नं. R-9/171/1/6 क्षेत्र २४२.६३ स्के. फुट या मिळकती बँकेच्या हक्कात रजि गहाणखत दस्त नं. ६६३/२०१५ दि. ०५/०२/२०१५ अन्सये गहाणखत करुन दिलेली आहे व सदरच्या मिळकती हया महानगर पालिका हद्दीतील असून ज्याची चतु:र्सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस : महेश नंदकिशोर अग्रवाल पश्चिमेस : दुकान नं. २
दक्षिणेस : महेश नंदकिशोर अग्रवाल उत्तरेस : ५ फूट पॅसेज

३) ऋणको/कर्जदार श्री भक्ती डोअर पार्ट अनिता, स्वप्नील पिलाजी यांचे जामीनदार सूजाता उमाशंकर खोबरे यांच्या मालकी व ताब्यातील ग्रामपंचायत वरवंटी हद्दीतील मिळकत गट नं. ९२ एकुण क्षेत्र ०० हे ८० आर या मिळकती बँकेच्या हक्कात रजि गहाणखत दस्त नं. २९६९/२०१८ दि. १३/०४/२०१८ अन्वये गहाणखत करुन दिलेली आहे व सदरच्या मिळकती हया ग्रामपंचायत हद्दीतील असून ज्याची चतु:र्सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस : उमाशंकर खांबरे यांची जमीन पश्चिमेस : भिमाशंकर खोबरे यांची जमीन
दक्षिणेस : नागनाथ खोबरे याचं जमीन उत्तरेस : घटनेश्वर खोबरे यांची जमीन

टिप : ही नोटीस दिल्यापासून ३० (तीस ) दिवसाचे आत आपले थकलेले कर्ज खाते व्याज, मुद्दल व इतर खर्चासह रक्कम भरुन बेबाक करावे. अन्यथा कायद्यातील तरतूदी प्रमाणे या जिल्हा दंडाधिकारी लातूर यांच्याकडे कब्जा/ताबा घेणेसाठी रितसर प्रकरण दाखल करुन ताबा घेतला जाईल व त्यानंतर सदरील स्थावर मालमत्तेची जाहीर लिलावा द्वारे विक्री केली जाईल याची नोंद घ्यावी.
ही ताबा नोटीस दिली ता. १०/०१/२०२४

ए.आर. चौधरी
वसूली अधिकारी
दि उदगीर अर्बन को.ऑप.बँक लि., उदगीर

## जाहिरनामा
## दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ३३ /२०२३ निशाणी क्र. ०६

अर्जदार कलावती भ्र. गोपीनाथ भिंगे ज्यापेक्षा पती नामे गोपीनाथ विरु भिंगे हे दिनांक २५/१०/२०२३ रोजी कमालवाडी ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | कलावती भ्र. गोपीनाथ भिंगे | ७० | पत्नी |
| २) | रंजना दिलीप बैकेरे | ४५ | मुलगी |
| ३) | संजय गोपीनाथ भिंगे | ४० | मुलगा |
| ४) | अंजिव गोपीनाथ भिंगे | ३५ | मुलगा |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक २३/०२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : २८/०२/२०२४

आदेशावरुन

(आर.टी.शिंदे) व.लिपिक — शिक्का — (पी.एम. नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

## जाहिरनामा
## दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ३६ /२०२३ निशाणी क्र. ०६

अर्जदार वैभव पि. राजकुमार बिरादार ज्यापेक्षा वडील नामे राजकुमार बाबुराव व छायाबाई राजकुमार बिरादार हे दिनांक ०३/०२/२०२४ व आई दि. १५/११/२०२३ रोजी मौजे ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | वैभव पि. राजकुमार बिरादार | २६ | मुलगा |
| २) | अनिल पि. राजकुमार बिरादार | २४ | मुलगा |
| ३) | प्रांजली भ्र. दयानंद गाजरे | २८ | मुलगी |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक २३/०२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : ०३/०४/२०२४

आदेशावरुन

(आर.टी.शिंदे) व.लिपिक — शिक्का — (पी.एम. नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

# ग्राम पंचायत कार्यालय निडेबन ता.उदगीर जि.लातूर

## जाहीर प्रगटन

दिनांकः २४/०२/२०२४

तमाम नागरिकांना या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, मादलापूर ग्राम पंचायत हद्दीतील खालील प्लॉट मालकांनी / घर मालकांनी आपल्या प्लॉटची/घराचे नामांतर होण्यासाठी आवश्यक पुरावा आणि दस्तऐवज दाखल केल्याने खालील प्लॉटच्या, घराच्या मालकी हक्काबाबत इतर कोणाचे हक्क संबंध हरकती असतील तर आजपासून पुढील तारखेपर्यत म्हणजेच दि. ११.०३.२०२४ पर्यंत सबळ पुराव्यासह ग्राम पंचायत कार्यालय,मादलापूर येथे हरकती सादर कराव्यात ज्या प्लॉटच्या / घराच्या संदर्भात तक्रारी /हरकती नाही त्यांची नोंदी /फेरफार कायदेशिररित्या मुदतीनंतर केले जाईल. त्यानंतर कोणाचीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. म्हणून हे जाहीर प्रगटन देत आहोत कृपया संबंधीतांनी याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | लिहून घेणार | लिहून देणार | मिळकतीचे वर्णन | चतुःसिमा | ख.ख.न |
|---|---|---|---|---|---|
| १ | अखिलमिया शब्बीरमिया शेख | माणिक माधवराव मेतगे<br>मुजम्मिल रफिक पठाण | स.न.८४/१/१<br>प्लॉट नं.६<br>पु.प. १२.१९ मी<br>द.उ.८.१३ मी<br>एकुण क्षेत्रफळः ९९.१० चौ.मी.<br>ग्रा.पं.नं. ० | पुर्वेस - प्लॉट नं-०९<br>पश्चिमेस- ९ मी. रोड<br>उत्तरेस - प्लॉट नं. ०७<br>दक्षिणेस - प्लॉट नं. ०८ | ४९२६/<br>२०२३ |
| २ | सुनीलकुमार पिराजी पाबाळू | मारोती नागोराव केंद्रे | स.न. ३२/१<br>प्लॉट नं. १६<br>पु.प. १५ मी<br>द.उ. १० मी<br>एकुण क्षेत्रफळः ९९.१० चौ.मी.<br>ग्रा.पं.नं. २०३२ | पुर्वेस - रोड<br>पश्चिमेस- प्लॉट नं. १४ व १८<br>उत्तरेस - प्लॉट नं. १५<br>दक्षिणेस - प्लॉट नं. १७ | २५४/२०१९ |
| ३ | अब्दुल मोईज अब्दुल अझीझ देशमुख | खुरेशी निजाम अब्दुलसाब कसाब | स.न. ८१<br>प्लॉट नं. २१<br>पु.प. ४७<br>द.उ. २५<br>एकुण क्षेत्रफळः ११७५ चौ.मी.<br>ग्रा.पं.नं. ७४९५ पैकी | पुर्वेस - प्लॉट नं. २६<br>पश्चिमेस- २० रोड<br>उत्तरेस - प्लॉट नं. २२<br>दक्षिणेस - शमाशोद्दीन व इतर यांची जमीन | ३०३३/२०१९ |
| ४ | | | स.न. ८४<br>प्लॉट नं. २६<br>पु.प. द.बा. ४९ उ.बा. ५०<br>द.उ. २५<br>एकुण क्षेत्रफळः १२३८<br>ग्रा.पं.नं. ७४९५ | पुर्वेस - २० रोड<br>पश्चिमेस- प्लॉट नं. २१<br>उत्तरेस - प्लॉट नं. २५<br>दक्षिणेस - शमाशोद्दीन व इतर यांची जमीन | ३०३३/२०१९ |
| ५ | कादरी सईदा नाहीम सय्यद माजिद | सहारा बेगम अनवर शेख<br>शिफा बेगम आजीमोद्दीन शेख | स.न. १/१<br>प्लॉट नं. ३<br>पु.प. ११ मी<br>द.उ. १५ मी<br>एकुण क्षेत्रफळः १६५ चौ.मी<br>ग्रा.पं.नं. ६९३८ | पुर्वेस - प्लॉट नं.४<br>पश्चिमेस- प्लॉट नं. २<br>उत्तरेस - २० रोड<br>दक्षिणेस - प्लॉट नं. १३ | ५१७२/२०२३ |
| ६ | बालाजी भालचंद्र डांगे<br>लताबाई भालचंद्र डांगे | राजकुमार शिवमुर्तीप्पा इदलगावे | स.न. २१<br>प्लॉट नं. ४४<br>पु.प. ३०<br>द.उ. ४५<br>एकुण क्षेत्रफळः १३५०<br>ग्रा.पं.नं. १६८६ | पुर्वेस - प्लॉट नं.३९<br>पश्चिमेस- प्लॉट नं. ५५<br>उत्तरेस - १५ रोड<br>दक्षिणेस - प्लॉट नं. ४५ | ९१८/२०२४ |
| ७ | दीपक रावसाहेब गायकवाड | तुळशीराम ज्ञानोबा पडिले | स.न. २/न/१<br>प्लॉट नं. ४४<br>पु.प. द.बा. ८१ उ.बा. ६५<br>द.उ. पु.बा. ०० प.बा. ३६<br>एकुण क्षेत्रफळः १२१५<br>ग्रा.पं.नं. ० | पुर्वेस - रोड<br>पश्चिमेस- प्लॉट नं. ४३<br>उत्तरेस - खुली जागा<br>दक्षिणेस - २० रोड | कोर्ट डिग्री<br>CJJD Udgir<br>M.A.No.<br>34/2021 |
| ८ | अध्धप दिवाकर शेळकीकर | विठ्ठल तुकाराम फावडे | स.न. ९६/अ/२<br>प्लॉट नं. १२<br>पु.प. ४०<br>द.उ. ३०<br>एकुण क्षेत्रफळः १२०००<br>ग्रा.पं.नं. ७४५४ | पुर्वेस - प्लॉट नं. २५<br>पश्चिमेस- २० रोड<br>उत्तरेस - प्लॉट नं. ११<br>दक्षिणेस - प्लॉट नं. १३ | ८८२/२०२४ |
| ९ | राजमाता जिजाउ प्रतिष्ठा, उदगीर तर्फे<br>अध्यक्ष- विवेकानंद अर्जुनराव सुकणे<br>सचिव - प्रदीप रामदास ढगे | लक्ष्मीकांत बंकटलालजी लाहोटी<br>दिनेशकुमार मुरलीधर इनाणी | स.न. ७७/१<br>प्लॉट नं. ०<br>पु.प. द.बा. ७१.१३ मी उ.बा.३५.८२ मी<br>द.उ. पु.बा. ८५.८४ मी प.बा.७३.१२ मी<br>एकुण क्षेत्रफळः<br>ग्रा.पं.नं. | पुर्वेस - प्लॉट नं. १३ ते १९<br>पश्चिमेस- ९ मी रोड<br>उत्तरेस - शिवाजी पाटील यांची जमीन<br>दक्षिणेस - १२ मी रोड | ५२७/२०२४ |
| १० | धनंजय जगन्नाथ गुडसुरकर<br>व्यास उर्फ अजय जगन्नाथ गुडसूरकर | जगन्नाथ व्यासरास गुडसुरकर | स.न. १०/अ<br>प्लॉट नं. ३७<br>पु.प.३०<br>द.उ. पु.बा. ५०.१० मी प.बा. ५०.८<br>एकुण क्षेत्रफळः १५२३<br>ग्रा.पं.नं. १४०६ | पुर्वेस - सुरेखा बोंडगे प्लॉट<br>पश्चिमेस- धनंजय गुडसुरकर यांचा प्लॉट<br>उत्तरेस - नाला<br>दक्षिणेस - २० फु. रस्ता | मृत्यू पत्र<br>५७९०/२०२१ |

नोटः- १)ग्राम पंचायतची मासिक सभा झाल्यानंतरच नमुना नं.८ची नक्कल मिळेल.
२) नजर चुकीने न्यायप्रविष्ठ प्रकरण व डबल रजिस्ट्री नोंद झाल्यास रद्द करण्याचे अधिकार ग्राम पंचायतला असतील.

ग्रामसेवक उपसरपंच सरपंच

**ग्राम पंचायत कार्यालय मादलापूर ता. उदगीर जि.लातूर**




# ट्रॅक्टर नांगरणी महागली, शेतकऱ्यांपुढे संकट

## शेतीची मशागत सुरू, शेतमालाला भाव मिळेना



**शिरूर अनंतपाळ / प्रतिनिधी-** तालुक्यातील येरोळ व परिसरात शेतात नांगरणीसह इतर शेती मशागतीची कामे सुरू आहेत. मात्र, डीझेलच्या दरवाढीचा फटका शेतीच्या मशागतीस बसला असून, शेतकऱ्यांपुढे नवे संकट उभारले आहे.

सद्यःस्थितीत रब्बी हंगामातील पिकाच्या राशी झालेल्या रिकाम्या जमिनी शेतकरी ट्रॅक्टरद्वारे नांगरणी करीत आहेत. उन्हाळ्यात शेती चांगली तापल्यास मृग नक्षत्रात पडणारा पाऊस नांगरणीमुळे शेतात मुरला जातो.

यामुळे शेतीची नांगरणी करण्यात शेतकरी व्यस्त आहे. बैलांच्या सहायाने नांगरणीऐवजी सध्या ९० टक्के शेतकरी ट्रॅक्टरचा वापर करूनच मशागत करतात. गेल्यावर्षी हलक्या जमिनी नांगरणीचा दर एकरी दीड हजार रुपये तर भारी चिकणीच्या जमिनीचा दर एक हजार सातशे रुपये होता. यंदा एकरला पाचशे रुपयांची वाढ करण्यात आली आहे.

निसर्गाच्या विविध अरिष्टांसोबत डीझेल दरवाढीचा फटकाही बसत असल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे.

### डिझेलचे दर ९५ रुपये लीटरपर्यंत

यांत्रिकी युग असल्याने शेतकरी आधुनिक शेतीला पसंती देतात. पूर्वी शेतीची कामे बैलांच्या सहायाने केली जात होती. मात्र, बैलांची संख्या कमालीची घटली असून, यांत्रिकी शेती करण्यावरच शेतकऱ्यांकडून भर दिला जात आहे. ट्रॅक्टरद्वारे शेतीची मशागत त्वरित होत असल्याने नांगरणी, फवारणी, शेतमाल वाहतूक, पेरणी, रोटावेटर आदी कामे ट्रॅक्टरच्या सहायाने केली जातात. डीझेलचे दर वाढत असल्याने याचा परिणाम शेतीच्या मशागतीवर झाला आहे. आता डीझेलचे दर ९५ रुपये लीटरपर्यंत गेल्याने नांगरणी व कोळपणीसाठी शेतकऱ्यांना गत वर्षीपेक्षा किमान हेक्टरी एक हजार रुपये अधिक भार उचलावा लागत आहे. सध्या एक एकर नांगरणीला १० ते १२ लीटर डीझेल लागते. ट्रॅक्टरसोबत चालक व मदतनिसांचा खर्च वेगळा लागतो. डीझेल दरवाढीमुळे दोन हजार रुपये एकर दर करूनही परवडत नाही.

**– शरद तुकाराम चोंचडे, ट्रॅक्टर मालक**

सरकारच्या चुकीच्या निर्णयामुळे शेती दिवसेंदिवस तोट्याची होत आहे. इंधनाबरोबर मजुरी, खते, औषधांच्या किमतीचे दर विचारात घेता १० वर्षांपूर्वी शेतमालाचे दर तेच होते, आजही तेच आहेत. उत्पादन खर्च वाढल्याने नफा शिल्लक राहत नाही. शासनाने याचा विचार करायला हवा.

**– गुंडेराव चौसष्टे, युवा शेतकरी, येरोळ**

डीझेलच्या दरात सतत होणाऱ्या वाढीमुळे शेतकऱ्यांसाठी ट्रॅक्टरच्या सहायाने करावयाची मशागत महागली आहे. शेतमाल बाजार समितीपर्यंत नेणाऱ्या वाहतुकीचा दर वाढल्याने 'इकडे आड, तिकडे विहीर' या कात्रीत बळीराजा सापडला आहे.

# दयानंद विज्ञानमध्ये आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना,राष्ट्रीय सेवा योजना,युवती कल्याण मंडळ व भालचंद्र ब्लड बँक आणि डॉ.लाल पॅथॉलॉजी लॅब यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२१ फेब्रुवारी २०२४ रोजी आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले होते.

या शिबिराचे उद्घाटन उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांच्या अध्यक्षस्थानी संपन्न झाले.याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणूनडॉ.सुनीताबजाज,एनसीसी कॅप्टन डॉ.विजेंद्र चौधरी,रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.राहुल जाधव व डॉ.सुरज कोल्हे,युवती कल्याण मंडळ समन्वयक प्रा.शितल पाटील,डॉ.टी. एच.मुजावर,प्रा.नुजहत शेख,डॉ. आशिष पाटील,भालचंद्र ब्लड बँकेचे दिगंबर पवार,महेंद्र गंधोले,सुरेखा हजारे,रमाकांत सूर्यवंशी,संजय ठाकूर आणि डॉ.लाल पॅथॉलॉजीचे इरफान सय्यद,परवेज शेख,आशिक शेख तसेच महाविद्यालयातील डॉ. आण्णाराव चौगुले,डॉ.युवराज सारणीकर,डॉ.जमन अंगुलवार,डॉ.गजानन बने,डॉ. रामशेट्टी शेटकार, डॉ.अमोल ठोसर,दिलीप राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.सिद्धेवर बेल्लाळे यांनी रक्तदान करणे हे सर्वश्रेष्ठ दान असून रक्तदानामुळे अनेक जणांचे जीव वाचतात. अशा या रक्तदान शिबिरात महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थीनी,स्वयंसेवक उस्फूर्तपणे सहभाग नोंदवतात. सामाजिक व राष्ट्रीय कार्यात विद्यार्थ्यांचा सहभाग हिरीरीने असतो,असे त्यांनी सांगितले तर प्रमुख पाहुणे डॉ.सुनीता बजाज यांनी उत्तम निरोगी आरोग्यासाठी मुलामुलींनी योग्य त्या वेळी आरोग्य तपासणी करणे अत्यंत आवश्यक असते,असे त्यांनी सांगितले.

सदरील शिबिरात हिमोग्लोबिन, थायराइड, शुगर,युरिक सिड, शुगर, कोलेस्ट्रोल, कॅल्शियम, व्हिटॅमिन यासहित ९५ जणांची आरोग्य तपासणी तर ८१ जणांची रक्त तपासणी व १२ जणांनी रक्तदान केले. डॉ.आशिष पाटील यांनी मुलांचे आरोग्य तपासणी केली.या शिबिराच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांचेही प्रोत्साहन व मार्गदर्शन मिळाले.याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,शिक्षकेत्तार कर्मचारी, एनएसएस प्रतिनिधी हेमंत जाधव, चैतन्य पवार,प्रज्वल जाजे आणि एनसीसी,एनएसएस,युवती कल्याण मंडळाच्या विद्यार्थ्यांनी बहुसंख्येने उपस्थित होते.



## शिक्षणाबरोबर मुलांना मैदानी खेळ आवश्यक; इंदिरा गांधी कन्या शाळेत शालेय साहित्याचे वाटप

शिरूर अनंतपाळ / प्रतिनिधी- : तालुक्यातील उजेड येथील इंदिरा गांधी प्राथमिक शाळेत गांधीबाबा यात्रे निमित्त घेण्यात आलेल्या शालेय स्पर्धेतील विजयी विद्यार्थ्यांसह शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

खेळांतून मुलांना शिस्त, खिलाडूवृत्ती, सांघिक भावना, महत्त्वाकांक्षा या गोष्टींचा लाभ होतो. हे सर्व गुण अत्यंत महत्त्वाचे असून खेळामुळे बालकांना नैतिक शिक्षणाचेही पाठ मिळतात, असे मत माजी जि.प.सदस्य ऋषीकेश बद्दे यांनी व्यक्त केले.

कार्यकमाचे अध्यक्षस्थानी गांधीबाबा यात्रेचे संयोजक पत्रकार शकील देशमुख हे होते.याप्रसंगी यात्रा कमिटीचे अनंत जाधव,व्यंकट डांगे, पत्रकार पी.एस. कदम, तंटामुक्ती अध्यक्ष संजय बिराजदार, मुख्याध्यापक वसंतराव किडीले यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी गांधीबाबा यात्रेचे उत्कृष्ट नियोजनाबद्दल पत्रकार शकील देशमुख यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.या प्रसंगी पत्रकार पी. एस.कदम यांच्या वतीने शाळेला टेबल भेट देण्यात आले.

## उपविभागीय कार्यालयाच्यातवीने संत गाडगेबाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

लातूर/ प्रतिनिधी- येथील औसा आणि रेणापूर उपविभागीय कार्यालयाच्यावतीने संत गाडगेबाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला रेणापूरचे उपविभागीय अधिकारी अनुप पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्याात आले.

यावेळी उपविभागीय न्याय दंडाधिकारी अरुण महापुरे, अॅड.रमेश खाडप, अव्वल कारकुन प्रविण पेंडकर, अव्वल कारकुन दिवाकर जोशी, अव्वल कारकून विवेक स्वामी, पत्रकार बाळासाहेब जाधव, लिपीक अशोक भोसले, शिवानंद स्वामी, कोतवाल बबीता सूर्यवंशी यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.





## येरोळ येथे संत शिरोमणी गुरु रविदास जयंती साजरी

प्रशांत तांबोळकर

येरोळ : येथील ग्रामपंचायत कार्यालयात संत शिरोमणी गूरु रविदास महाराज यांची ६४७ वी जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी ग्रा. प. कार्यालयामध्ये संत शिरोमणी गूरु रविदास महाराज यांच्या प्रतिमेच पुजन उपसरपंच सतिस सिंदाळकर यांच्या हस्ते करण्यात आले.

संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांच्या मानवता वादी, विज्ञानवादी व परिवर्तन वादी विचारांचा वारसा पुढे चालविल्यास सामाजीक बंधुभाव तयार होईल असे मत उपसरपंच सतिस सिंदाळकर यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमास शाम सिंदाळकर, प्रकाश बनसोडे, शंकर वाघमारे, उध्दव वाघमारे, दयानंद बनसोडे, गौतम बनसोडे, मच्छिद्र भालेकर, नंदकुमार साकोळकर, बालाजी वाघमारे, बालाजी झटे , बाबुराव वाघमारे, उध्दव वाघमारे, विनोद लोंढे यांच्या सह नागरिक उपस्थित होते

# जयक्रांती महाविद्यालयाच्या युवकांनी जलदूत व्हावे : डॉ. मल्लिकार्जुन करजगी

लातूर : येथील भारत शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे ङ्गयुवकांचा ध्यास ग्राम - शहर विकासफ विशेष वार्षिक शिबीर दिनांक २३ फेब्रुवारी, २०२४ ते २९ फेब्रुवारी, २०२४ या कालावधीमध्ये मौजे जमालपुर ता. औसा जि. लातूर येथे संपन्न होत आहे.

या शिबिराचे दिनांक २३ फेब्रुवारी, २०२४ रोजी उद्घाटन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांच्या हस्ते झाले. यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, प्रमुख पाहुणे माजी प्राचार्य व विद्यापीठाच्या सिनेट सदस्य डॉ. कुसुम मोरे, मंचावर विभागीय समन्वयक डॉ. रत्नाकर बेडगे, रासेयो जिल्हा समन्वयक डॉ. केशव अलगुले, मुख्याध्यापक श्री.संतोष पिट्टलवाड, सरपंच श्री. खंडू सोनटक्के, ग्रामपंचायत सदस्य श्री.ज्ञानोबा कांबळे, श्री. गंगाधर साळुंके, यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना डॉ. मल्लिकार्जुन करजगी म्हणाले की, लातूर जिल्ह्याला सध्या पाण्याची खूप मोठी टंचाई असून मानवी जीवनाला सतत भेडसावणारा प्रश्न म्हणजे जलव्यवस्थापन बनला आहे. राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून स्वयंसेवकानी जलव्यवस्थापनाचा इतिहास आचरणात आणावा छ. शिवाजी महाराजांचे जलव्यवस्थापन, त्याचबरोबर इतर राजांची सुद्धा जलव्यवस्थापनाची भूमिका आणि कार्य अभ्यासावीत आणि त्याचा अवलंब जीवनात करावा, भविष्यामध्ये अशा पद्धतीचे काम करणारे जयक्रांती महाविद्यालयाचे युवक हे जलदूत म्हणून त्यांनी काम करावं त्याचबरोबर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या या शिबिरात वेगवेगळ्या पद्धतीने शासकीय योजनांची माहिती देणे, बालविवाहावर पथनाट्य सादर करणे, रस्ता सुरक्षा अभियान, आरोग्य विषयक जनजागृती, युवा मतदार नोंदणी, यासारख्या प्रश्नावर लक्ष केंद्रित करून युवकांनी काम करणे अतिशय गरजेचे असल्याचे मत यावेळी व्यक्त केले. तर प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना माजी प्राचार्य डॉ. कुसुम मोरे म्हणाल्या की, राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी हा सजग असतो त्याला समाजातील समस्यांचे भान आलेला असते हा स्वयंसेवक सतत कुटुंबाच्या समाजाच्या आणि देशाच्या सेवेसाठी कार्य करण्याची त्याची वृत्ती युवक शिबिराच्या माध्यमातून विकसित होत. असते तो संस्कारी बनत असतो, ज्या गावांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेची शिबीरे झालेली आहेत.

आणि तेथे प्रामाणिकपणे युवकांनी काम केले तर त्या तर ती गावे तीर्थक्षेत्रे होतील यात शंका नाही, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून श्रमदानाबरोबरच संस्काराची शिदोरी सुद्धा विद्यार्थ्यांनी घ्यावी विद्यार्थी विचारवंत चारित्र्यसंपन्न व सुदृढ आरोग्याचा बनून त्यांनी काम करावे, त्यातूनच खऱ्या अर्थाने राष्ट्रीय सेवा योजनेची शिबीर सार्थक होतील असे मत व्यक्त केले. विभागीय समन्वयक डॉ. रत्नाकर बेडगे यांनी व्यक्तिमत्व विकासाच्या अनेक संधी राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरामध्ये आहेत त्याबरोबरच विद्यार्थ्यांनी कुटुंबामध्ये आदर्श व्यक्ती म्हणून जीवन जगावं आई-वडिलांचा आदर करावा, संस्कारक्षम व्यक्तिमत्व म्हणून आपली ओळख निर्माण करावी, खऱ्या अर्थाने सामाजिक भान विद्यार्थ्यांना येणे हे आवश्यक आहे, आपल्या आजूबाजूचा परिसर, त्या परिसरात दिवसेंदिवस निर्माण होत असलेल्या समस्या त्या सोडविण्यासाठी वेगवेगळ्या कल्पना आपण वापरणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाबरोबरच शाळाबाह्य जीवन-जाणिवा आपल्यात निर्माण होणे आवश्यक आहे, असे मत व्यक्त केले. तर अध्यक्ष समारोप करताना प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी हा सर्वगुणसंपन्न असावा, या विद्यार्थ्यांनी हाती घेतलेले कोणतेही काम हे समाजासाठी हितकारक असावे आणि ते साध्य करण्यासाठी महाविद्यालय स्तरावर ज्या गोष्टींची गरज पडेल त्या पुरवल्या जातील असे आवाहन केले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी आपल्या जीवन जाणिवा आणि विशेष शिबिरातील शिस्त या दोन्हींचा समन्वय साधून स्वयंसेवक हा शिस्तीचे उत्तम उदाहरण बनावे विद्यार्थ्यांनी श्रमदानातून समाज उपयोगी काम करावे तर बौद्धिक क्षेत्रामधून आपले नेतृत्व गुण विकसित करावे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी व लातूर जिल्ह्याचे जिल्हा समन्वयक डॉ. केशव अलगुले यांनी केले, सूत्रसंचालन प्रा.प्रज्ञा कांबळे यांनी केले, तर आभार कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रमोद चव्हाण यांनी मानले, कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जाधव रामदास, सय्यद इब्राहिम, डॉ. राजेश्वर खाकरे, डॉ. अविनाश पवार,डॉ. दिलीप गुंजारगे, डॉ. राजेभाऊ पवार, प्रा. शिवराज बांजुळगे, ओम साळुंखे, कुराडे परशुराम,खुणे अमर,राहुल शिंदे, निलंगेकर श्रद्धा, स्वाती पटनुरे सांची खुणे यांनी परिश्रम घेतले.




# संत रविदास महाराजांची विचारधारेत मनुष्य धर्माचा केंद्र बिंदू होता

लातूर / प्रतिनिधी- क्रांतिकारी विचारवंत समाज सुधारक संत श्रेष्ठ रविदास महाराज यांचे विचार आणि तत्त्वज्ञान कार्यात मनुष हाच धर्माचा केंद्र बिंदू होता असे प्रतिपादन आय.क्यू.ए.सी. समन्वयक तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आनंद शेवाळे यांनी केले.

महाराष्ट्र शासन, महाविद्यालय जयंती उत्सव समिती आणि अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतिकारी विचारवंत समाज सुधारक संत श्रेष्ठ रविदास महाराज यांची जयंती प्राचार्य कक्षात उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, प्रा. धोंडीबा भुरे, डॉ. दिनेश मौने, डॉ. बाळासाहेब गोडबोले, डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. यशवंत वळवी, डॉ. शिवप्रसाद डोंगरे, डॉ. मनोहर चपळे, प्रा. किसनाथ कुडके, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे आणि शिवाली मुकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम संत श्रेष्ठ रविदास महाराज यांच्या प्रतिमेला सर्वांच्या उपस्थितीत पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना डॉ. शेवाळे म्हणाले की, संत रविदासांनी आपले आयुष्य संपूर्ण आयुष्य जातीवर आधारलेल्या विषमतावादी समाज व्यवस्था बदलण्यासाठी खर्ची घातले. एकमेकांप्रती आदर निर्माण व्हावा. जातीय आणि सामाजिक सलोखा निर्माण व्हावा अशी त्यांची धारणा होती असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे म्हणाले की, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि मानवता यावर आधारित संत रविदास यांचे विचार होते. यावेळी कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे यांनीही संत रविदास यांच्या कार्यावर प्रकाश टाकला.

अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, संत रविदास म्हणजे प्रचंड प्रतिभा आणि प्रभावी वाणी, संघटन कौशल्य, सामान्य जनतेविषयी श्रद्धा, प्रेम, करुणा आणि बंधुत्व आदि सर्व गुणांनी संपन्न असे अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.एस. एस.मुसळे यांनी केले तर आभार डॉ.ए.बी.भैरट यांनी मानले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विरसेन उटगे, यशपाल ढोरमारे, योगेश मोदी, विनायक लोमटे, संतोष येचेवाड, शुभम बिराजदार, अजय गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

# दयानंद विज्ञानमध्ये संत रविदास महाराज यांची जयंती उत्साहात साजरी




लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.२४ फेब्रुवारी २०२४ रोजी संत रविदास महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे यांनी जातीय आणि सामाजिक सलोख्याचे प्रणेते संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि सर्वांना जयंतीच्याही शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,पर्यवेक्षक डॉ.संध्या कोल्हे,पीआरओ प्रा.बळवंत सूर्यवंशी,संजय तिवारी,विनोद घार,सतीश तांदळे,मोहसीन शेख,किशोर जाधव,सुदाम सातपुते,ज्ञानदेव माळी,अमोल क्षीरसागर,श्रावण माळी,पूजा सूर्यवंशी यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्ह्यातील विविध ठिकाणी तीन बालकांचे अपहरण !

धाराशिव दि.२४ (प्रतिनिधी) - जिल्ह्यातील बालकांचे अपहरण होण्याच्या घटनेमध्ये वाढ होत चालली असून ही अतिशय गंभीर बाब आहे. याची कारणे काय आहेत हे शोधण्याची भूमिका पोलीस प्रशासनाने घेणे आवश्यक आहे. कारण दि.१९ फेब्रुवारी रोजी एका १५ अल्पवयीन बालकाचे अपहरण केले आहे. त्याचा तपास अद्याप लागलेला नसताना पुन्हा परंडा तालुक्यातील एका १६ वर्षीय बालकाचे अपहरण केले आहे. त्यामुळे बालकांच्या अपहरणाची संख्या दिवसेंदिवस वाढीत असल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून त्यांची चिंता वाढली आहे.याबाबत अधिक माहिती अशी की, परंडा तालुक्यातील जवळा (नि.) येथील ज्ञानेश्र्वर शंकर चव्हाण (वय- १६ वर्षे) या बालकाचे दि.२० फेब्रुवारी रोजी दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी धाराशिव शहरातील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या पाठीमागे येथून अपहरण केले आहे. या प्रकरणी कैलास शंकर चव्हाण (वय ४३ वर्षे) यांनी दि.२१ फेब्रुवारी रोजी दिलेल्या तक्रारीवरुन धाराशिव पोलीस ठाण्यात कलम ३६३ भा.दं.वि.सं. अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

तर धाराशिव तालुक्यातील तेर येथील व ह.मु. येडशी येथील गणेश विलास मदने (वय- १६ वर्षे) या बालकाचे दि.२० फेब्रुवारी रोजी रात्री ९.३० ते सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास येडशी येथून अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी अपहरण केले आहे. या प्रकरणी चुलते अमर वैजीनाथ लवटे (वय ३५ वर्षे) यांनी दिलेल्या तक्रारीवरुन धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात कलम ३६३ भा.दं. वि.सं. अन्वये गुन्हा नोंदवला आहे. बालकांचे अपहरण करण्याच्या घटना अतिशय गंभीर असून त्या पालकांना अधिकच भेडसावणाऱ्या आहेत.

# विलासराव देशमुख फाऊंडेशन लातुर संकुलात शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा

लातुर प्रतिनिधी/ प्रतिनिधी- लातूरच्या विलासराव देशमुख फाउंडेशन शैक्षणिक संकुलात छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.बुधवार दि.२१ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या या सोहळ्यात ढोल,ताशे, लेझीम यासह पारंपरिक वादनाने भारावलेले वातावरण पाहायला मिळाले. तसेच संकुलात ठिकठिकाणी सादर होणाऱ्या पोवाड्यांमधून उलगडणारी श्री छत्रपती शिवाजी महाराजांची शौर्यगाथा आणि भगवे ध्वज हातात घेऊन उत्साहात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी व यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दलचा आदर,प्रेम आणि अभिमान व्यक्त करीत शिवप्रेमीनी विविध कार्यक्रमाचे सादरीकरण देखील केले.




छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव सोहळ्याची सुरवात ढोल,ताशा,झांजपथक,लेझीम पथक यांच्या साहाय्याने पालखी सोहळ्याने करण्यात आली. तदनंतर श्री छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार अपर्ण करीत महाराजांची आरती करून अभिवादन करण्यात आले व यानंतर विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र गीत सादर केले. या उत्सवामध्ये युवा शाहीर स्टार प्रवाह फेम श्री. अविष्कार देशिंगे यांनी महाराजांच्या आयुष्यावर अप्रतिम पोवाडा सादर करून सर्व शिवभक्तांची मने जिंकली.

या प्रसंगी व्ही.डी.एफ.स्कूल ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.बी. एस.वाकुरे यांनी शिवचरित्राची आजच्या काळातील आवश्यकता तसेच शिवाजी महाराजांची जीवनशैली, निर्णय घेणे व अंमलबजावणी यातून आजच्या पिढीने काय बोध घ्यावा या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.यावेळी बोलताना व्ही.डी.एफ.स्कूल ऑफ पॉलीटेक्नीकचे प्राचार्य श्री.राजकुमार साखरे यांनी उपस्थितांना छत्रपती शिवाजी महाराजांचे आचार विचार स्वतः अंगीकृत करून ते आपल्या दैनंदिन आचरणात देखील आणावेत तसेच महाराजांचे विचार पुढील पिढीत रुजवणे किती गरजेचे आहे हे सांगितले. यावेळी बोलताना व्ही.डी.एफ. स्कूल ऑफ इंजिनीरिंगचे प्राचार्य डॉ. मोहन बुके यांनी सर्व उपस्थिताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९४ व्या जयंती निमित्त शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी गोल्ड क्रेस्ट हाय च्या प्राचार्या श्रीमती उषाकिरण सूद आणि न्यू अर्पण ब्लड बँक लातूरचे प्रतिनिधी डॉ.कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवजयंतीचे औचित्य साधून सिव्हिल इंजिनीरिंग शाखेतील अद्यावत करण्यात आलेल्या फ्लुइड मेकॅनिक्स व हायड्रलिक्स लॅबचे उदघाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांनी टेक्निकल पोस्टर प्रझेंटेशन सादर केले.

# देगलूर येथे २८ रोजी संजय गांधी निराधार योजनेची

देगलूर(प्रतिनीधी): - देगलूर येथे तहसिल कार्यालयात संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजनेची लाभार्थी निवड बैठक दिनांक २८ फेब्रुवारी २०२४ रोजी समितीचे अध्यक्ष संतोष पाटील यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येणार असून पात्र व्यक्तींनी सविस्तर अर्ज सेतु सुविधा केंद्रावर ऑनलाईन करुन आवश्यक त्या कागदपत्रासह अर्ज दाखल करुन या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



या बैठकीत अनुदान मंजुर करुन घेण्यासाठी गोरगरीब, दिनदलित वृद्ध, शेतकरी, शेतमजुर, अपंग, अंध, वेडसर, अस्थीव्यंग, मुकबधीर, कर्णबधीर, गतीमंद, विधवा, कर्करोग, एड्स (एच.आय.व्ही.), कुष्ठरोग, क्षयरोग, निराधार, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे कुटूंब, सार्वजनिक आरोग्य विभागाने निश्र्चित केलेले दुर्धर आजार, घटस्फोटीत महिला, अत्याचारीत महिला, परितक्त्या महिला, अनाथ मुले, तृतीय पंथी, घटस्फोटीत झालेली परंतु पोटगी न मिळालेली महिला आदी पात्र असणाऱ्या व्यक्तींनी सर्व कागदपत्रासह सविस्तर अर्ज सुविधा केंद्रावार ऑनलाईन करुन सदर ची फाईल तहसील कार्यालयातील सं.गा.यो. शाखेत सादर करावे असे आवाहन समितीचे अध्यक्ष संतोष पाटील,सचिव तथा तहसीलदार राजाभाऊ कदम,नायब तहसीलदार बालाजी सुरनर,समितीचे सदस्य शिवाजी कनकंटे, शिवकुमार देवाडे, अशोक कांबळे, दिगंबर कौरवार, संदीप पाटील,सौ. माधुरी नारायण शिंदे यांनी केले आहे.

# मॅक्सवेलने फिंचचा विक्रम मोडत रचला इतिहास




दिल्ली-न्यूझीलंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील दुसरा सामना ७२ धावांनी जिंकून ऑस्ट्रेलियाने आता मालिकेत २-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियन संघाचा स्टार ऑलराऊंडर खेळाडू ग्लेन मॅक्सवेलनेही एक मोठी कामगिरी आपल्या नावावर केली आहे, ज्यामध्ये तो आता टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियासाठी सर्वाधिक षटकार ठोकणारा खेळाडू ठरला आहे. मात्र, या सामन्यात मॅक्सवेलला फलंदाजीत विशेष काही करता आले नाही आणि चार चेंडूत एका षटकारासह केवळ ६ धावा करून तो पॅव्हेलियनमध्ये परतला.

मॅक्सवेलने मोडला अरॉन फिंचचा विक्रम – ग्लेन मॅक्सवेलच्या आधी ऑस्ट्रेलियासाठी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम माजी कर्णधार ॲरॉन फिंचच्या नावावर होता, ज्यांनी १०३ सामने खेळताना १२५ षटकार ठोकले होते. आता मॅक्सवेलने त्याला मागे टाकले असून त्याने १०५ सामन्यांमध्ये १२६ षटकार ठोकले आहेत. या यादीत तिसऱ्या क्रमांकावर डेव्हिड वॉर्नर आहे, ज्याने आतापर्यंत ११३ षटकार ठोकले आहेत. याशिवाय टी-२० इंटरनॅशनलमध्ये सर्वाधिक षटकार मारणाऱ्या खेळाडूंच्या यादीत ग्लेन मॅक्सवेल तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे, ज्यामध्ये तो आता या यादीत फक्त मार्टिन गुप्टिल आणि रोहित शर्माच्या मागे आहे.

कमिन्सच्या अष्टपैलू खेळामुळे ऑस्ट्रेलिया जिंकला – ऑकलंडच्या मैदानावर खेळल्या गेलेल्या या दुसऱ्या टी-२० सामन्याबद्दल सांगायचे तर, ऑस्ट्रेलियन संघाने प्रथम फलंदाजी करताना ११५ धावांपर्यंत ५ विकेट गमावल्या होत्या. यामध्ये सलामीवीर हेडने २२ चेंडूत ४५ धावांचे योगदान दिले. त्यानंतर पॅट कमिन्सच्या २८ धावांच्या खेळीच्या जोरावर संघाला १७४ धावसंख्येपर्यंत मजल मारता आली. यानंतर ऑस्ट्रेलियाने शानदार गोलंदाजी केली आणि न्यूझीलंडचा न्यूझीलंडचा डाव १७ षटकांत १०२ धावांवर रोखला. न्यूझीलंडकडून ग्लेन फिलिप्सने सर्वाधिक ४२ धावांचे योगदान दिले. ऑस्ट्रेलियाकडून गोलंदाजीत ॲम झाम्पाने ४ तर नॅथन एलिसने २ विकेट्स घेतल्या. याशिवाय जोश हेझलवूड, पॅट कमिन्स आणि मिचेल मार्श यांनीही १-१ विकेट घेतली.

# रविचंद्रन अश्विनने रचला इतिहास! इंग्लंडविरुद्ध कसोटी क्रिकेटमध्ये झळकावले अनोखे शतक

राजकोट-रविचंद्रन अश्विनने इंग्लंडविरुद्ध एक खास शतक पूर्ण केले आहे. त्याने १०० कसोटी विकेट्स पूर्ण केल्या आहेत. अश्विनने रांची येथे खेळल्या जात असलेल्या चौथ्या कसोटीत इंग्लंडविरुद्ध हा विशेष आकडा पूर्ण करत इतिहास रचला आहे. इंग्लंडविरुद्ध १०० कसोटी विकेट्स घेणारा अश्विन पहिला भारतीय गोलंदाज ठरला. याआधी, राजकोटमध्ये खेळल्या गेलेल्या तिसऱ्या कसोटीच्या माध्यमातून भारतीय फिरकीपटूने ५०० कसोटी विकेट्सचा टप्पा गाठला होता.

रविचंद्रन अश्विनने टीम इंडियाला मोठे यश मिळवून दिले आहे. तुफानी फलंदाजी करणाऱ्या जॉनी बेअरस्टोला अश्विनने एलबीडब्ल्यू आऊट केले. तो ३५ चेंडूत ४ चौकार आणि १ षटकारासह ३८ धावा करून बाद झाला. ही विकेट घेताच रविचंद्रन अश्विनने इंग्लंडविरुद्ध आपल्या कसोटी विकेट्सचे शतक पूर्ण केले. अण्णा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अश्विनने इंग्लंडपूर्वी ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटीत १०० विकेट्सचा टप्पा ओलांडला आहे.



अश्विनने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटीत आतापर्यंत ११४ विकेट्स घेतल्या आहेत. ही आकडेवारी पाहता अश्विन ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडसाठी कसोटीत सरस आहे, असे म्हणता येईल.

आशियातील पहिला क्रिकेटपटू ठरला – रविचंद्रन अश्विन हा इंग्लंडविरुद्धच्या कसोटी क्रिकेटमध्ये १००० हून अधिक धावा आणि १०० विकेट्सचा टप्पा गाठणारा आशियातील पहिला क्रिकेटपटू ठरला आहे. रविचंद्रन अश्विनने कसोटी क्रिकेटमध्ये इंग्लंडविरुद्ध १०८५ धावा केल्या असून १०० विकेट्स घेतल्या आहेत. रविचंद्रन अश्विनने आता कसोटी क्रिकेटमध्ये इंग्लंडविरुद्धच्या २३ कसोटी सामन्यांमध्ये १०० बळी घेतले आहेत. रविचंद्रन अश्विनने भारताकडून ९९ कसोटी सामन्यांमध्ये ५०२ विकेट घेतल्या आहेत. कसोटी क्रिकेटमध्ये, रविचंद्रन अश्विनने ३४ वेळा पाच विकेट घेतल्या आहेत आणि ८ वेळा एका सामन्यात १० किंवा त्याहून अधिक बळी घेतले आहेत.

भारतासाठी ५०० कसोटी बळी घेणारा दुसरा गोलंदाज –रविचंद्रन अश्विन हा भारताचा ५०० कसोटी विकेट्स घेणारा दुसरा गोलंदाज आहे. भारतासाठी, माजी दिग्गज फिरकी गोलंदाज अनिल कुंबळे हा ५०० कसोटी विकेट्सचा टप्पा पार करणारा पहिला गोलंदाज आहे. अश्विनने मालिकेतील तिसऱ्या कसोटीत ५०० विकेट्स पूर्ण केल्या होत्या.

पान १ वरून

## इराणचा पुन्हा....

सिस्तान बलुचिस्तान येथे आहे. मागील काही वर्षांपासून जैश अल-अदलने इराणच्या सुरक्षा दलावर अनेकदा मोठे हल्ले केले. गेल्या डिसेंबरमध्येही जैश अल-अदलने सिस्तान बलुचिस्तानमध्ये एका पोलिस स्टेशनवर हल्ला करत त्याची जबाबदारी स्वीकारली. या हल्ल्यात जवळपास ११ पोलिस अधिकारी-कर्मचारी यांची जीव गेला होता.

## पक्षाच्या तुतारी...

यश मिळणार याची खात्री आहे. या ऐतिहासिक भूमीत आपण आलोय. या ठिकाणाहून प्रेरणा घेऊन जनतेची सेवा करूया असे त्यांनी म्हटले.

तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पवित्र किल्ल्यावर पक्षाच्या चिन्हाचे अनावरण होत आहे. ही तुतारी महाराष्ट्राच्या जनमानसात स्वाभिमानाचं प्रतीक बनली आहे. महाराष्ट्राच्या काळजातील तुतारी आता महाराष्ट्राच्या स्वाभिमानाची ललकारी होईल. शरद पवारांच्या नेतृत्वात प्रत्येक कार्यकर्ता आणि पदाधिकारी महाराष्ट्राचा स्वाभिमान कायम बुलंद राहण्यासाठी प्रयत्नशील राहील असे खासदार अमोल कोल्हे म्हणाले.

दरम्यान, तुतारी हे वाद्य आक्रमक सेना जेव्हा युद्धाला निघते तेव्हा वाजवले जाते आणि आपण जिंकल्यानंतर युद्धावरून जेव्हा परत येतो तेव्हादेखील तुतारी वाजवली जाते. निवडणुकीच्या युद्धात उतरत असताना ८४ वर्षांच्या आमच्या योद्धाला तुतारी हातात देऊन शुभ संकेत निवडणूक आयोगाने दिलेत. या लढाईत तुतारी वाजलेली आहे. विचारांची लढाई आम्ही जिंकू म्हणजे जिंकू असा विश्र्वास जितेंद्र आव्हाडांनी व्यक्त केला.

## नवे कायदे...

सीआरपीसीमध्ये ४८४ कलमे होती. आता भारतीय नागरिक संरक्षण संहितेत ५३१ कलमे असतील. १७७ कलमे बदलण्यात आली आहेत. ९ नव्या कलमांचा समावेश करण्यात आला आहे.

- आयईए : खटल्यातील तथ्य कसे सिद्ध होईल, जबाब, साक्ष कसे नोंदवले जातील, हे सर्व भारतीय पुरावा कायद्यानुसार निश्र्चित केले जाते. भारतीय पुरावा कायद्यात १६७ कलमे होती. आता यांमध्ये १७० कलमे असतील. २४ कलमांमध्ये बदल करण्यात आले आहेत. दोन नवीन कलमे समाविष्ट करण्यात आली आहेत. ६ कलमे रद्द करण्यात आली आहेत.

## सध्याचे शिक्षण...

शिक्षण घेण्यासाठी येतात. नवीन शाळा व महाविद्यालये स्थापण्याचा सरकारचा धोरणात्मक निर्णय असतो. या निर्णयात न्यायालय हस्तक्षेप करू शकत नाही. सरकारने सारासार विचार करून निर्णय घेतला आहे का? हे न्यायालय पाहू शकते.

## अंड्याच्या...

या ठिकाणी थेट ५० रुपयांनी घसरण होऊन अंडी दर ५५० रुपये प्रति शेकडापर्यंत खाली आला आहे. तर महाराष्ट्रातही अंडी दरात प्रति शेकडा २० ते २५ रुपयांनी घसरण नोंदवली गेली आहे.

## उ.प्र...

परीक्षेचा काय फायदा? असे उमेदवारांनी राहुल गांधींना सांगितले होते. यानंतर राहूल गांधींने विद्यार्थांना मी तुमच्या पाठिशी उभा आहे तुम्हाला चिंता करू नका मअसे आश्वासन दिले होते, यानंतर काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनीही शुक्रवारी योगी सरकारवर तोफ डागली होती, उत्तर प्रदेशातील प्रत्येक गावात चर्चा आहे, की योगी सरकार झोपले आहे, देश मंगळ आणि चंद्रावर जात असताना योगी सरकारला निष्पक्षपने परीक्षा देखील घेत येत नाहीतफ असा हल्ला प्रियंका गांधी यांनी चढवला होता.

## राज्यात गारठा....

स्तरात वा-याची चक्रीय स्थिती निर्माण झाली आहे. आग्नेय दिशेने येणा-या वा-यांमुळे राज्यात आर्द्रता वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे कोकण, गोव्यात कोरडे वातावरण राहण्याचा अंदाज आहे. सोमवारी, २६ रोजी सोलापूर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी हलका पावसाचा अंदाज आहे. सोमवार आणि मंगळवारी मराठवाड्यातील परभणी, नांदेड, हिंगोली परिसरात हलक्या पावसाचा अंदाज आहे.

धाराशिव, लातूर जिल्ह्यात पाऊस?

मंगळवार, २७ फेब्रुवारी रोजी धाराशिव आणि लातूर जिल्ह्यात पावसाचा अंदाज आहे. रविवार आणि सोमवारी विदर्भात सर्वत्र पावसाचा अंदाज आहे. मंगळवारी, २७ रोजी भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूर परिसरात हलक्या पावसाचा अंदाज आहे. सोलापूर आणि मराठवाड्यात अवकाळी पावसाचा फारसा जोर नसेल; मात्र विदर्भात अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता जास्त आहे. त्यामुळे हवामान विभागाने विदर्भात सतर्कतेचा इशारा दिला आहे.

## अंतर्गत रस्त्याच्या...

५ लक्ष,भोईसमुद्रगा ५ लक्ष, माटेफळ ५ लक्ष, खुंटेफळ ५ लक्ष, सामनगाव ५ लक्ष, निवळी ५ लक्ष, हिसोरी ५ लक्ष, भातांगळी ५ लक्ष, गातेगाव ५ लक्ष, बामणी ५ लक्ष, भडी ५ लक्ष, गांजूर ५ लक्ष, सलगरा बु. दोन कामे २५ लक्ष, सलगरा खु ५ लक्ष, कोळपा ५ लक्ष, गाधवड १० लक्ष, रेणापूर तालुका - रामवाडी पा. १० लक्ष, कामखेडा २० लक्ष, रामवाडी तीन कामे ख. २५ लक्ष, आनंदवाडी ५ लक्ष, मोहगाव ५ लक्ष, नरवटवाडी ५ लक्ष, कोष्टगाव ५ लक्ष, गोढाळा ५ लक्ष, भोकरंबा ५ लक्ष, मोरवड ५ लक्ष, मोटेगाव ५ लक्ष, वाला ५ लक्ष, दर्जी बोरगाव ५ लक्ष, सांगवी ५ लक्ष, घनसरगाव ५ लक्ष, फरदपूर ५ लक्ष, डि. देशमुख ५ लक्ष, वंजारवाडी ५ लक्ष, इंदरठाणा ५ लक्ष, पानगाव २० लक्ष, गव्हाण २० लक्ष, लखमापूर २० लक्ष, आणि औसा तालुक्यातील भादा सर्कल मधील भेटा दोन कामे ३० लक्ष, भादा ५ लक्ष, कवठा केज ५ लक्ष, सत्तरधरवाडी ५ लक्ष, सिंदाळवाडी ५ लक्ष, वडजी ५ लक्ष, वानवडा ५ लक्ष, काळमाथा तीन कामे ३० लक्ष, रिंगणी (गुळखेडा) दोन कामे २० लक्ष याप्रमाणे निधी मंजूर झाला आहे. गेल्या काही दिवसापासून मतदार संघातील अनेक गावात विविध विकास कामांना मोठ्या प्रमाणात निधी मिळत असल्याने आणि ६० गावातील अंतर्गत रस्त्याच्या कामाला निधी मंजूर झाल्याने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे त्या त्या गावातील भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी कार्यकर्त्यांसह नागरिकांनी आभार व्यक्त केले आहेत.

## लातूर येथील...

तत्वावर निवड झालेल्या १० युवक-युवतींना एकाच वेळेस यावेळी नियुक्ती पत्र वितरीत करण्यात आले.

इयत्ता दहावी ते पदव्युत्तर पदवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या युवक-युवतींना एकाच छताखाली रोजगाराच्या संधी आणि स्वयंरोजगाराबाबत मार्गदर्शन करण्यासाठी विभागीय नमो महारोजगार मेळावा आणि करिअर मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले. २३ फेब्रुवारी रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे या मेळाव्याचे उद्घाटन झाले. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा संदेश दाखविण्यात आला, तसेच कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे शुभेच्छा दिल्या. यावेळी क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, खासदार सुधाकर शृंगारे, आमदार रमेश कराड, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार उपस्थित होते. पहिल्या दिवशी विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी करिअर विषयी मार्गदर्शन केले.

## १०-१२ वीच्या...

चर्चा करून ही संदिग्धता दूर करण्यात आली. भाषा विषयाच्या प्रश्र्नांसाठी पेन किंवा पेन्सिल कशानेही विद्यार्थ्यांनी आकृत्या काढल्या तरी त्यांना गुण देण्यात यावेत, असा निर्णय घेण्यात आला असल्याचे राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी सांगितले.

## NOTICE FOR SRM

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co.Ltd.

The Executive Engineer (Civil), EHV CCCM Division, MSETCL, Latur (the Employer) invites online (e-Tender) offers on percentage rate basis and under two bid system (technical bid and commercial bid) from civil contractors on Mahatransco e-tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following works.

| Sr. No. | Name of works | Tender No. | Estimated cost (In Rs.)/ time limit / EMD (In Rs.) | Cost of the Tender + GST (In Rs.) |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | 3rd call to providing water proofing treatment over roof slab of control room & staff quarter at 132kV S/stn Bhoom & Naldurg Dist. Dharashiv. | MSETCL/EEC/ EHV/CCCM/ LTR/2023-24/ T-16 (RFX No. 7000029978) | Rs.2380360.00/- 90 days/ Rs. 23803.60- | Rs. 590 |
| 2 | 3rd call to providing water proofing treatment over roof slab of control room & BCR at 220kV S/stn Tuljapur Dist. Dharashiv. | MSETCL/EEC/ EHV/CCCM/ LTR/2023-24/ T-17 (RFX No. 7000029977) | Rs.2379142.00/- 90 days/ Rs. 23791.42- | Rs. 590 |

**Start Dt, &Time : 24.02.2024 11:00**
**End Dt. &Time : 02.03.2024 11:00**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in**
Contact Person: - The Executive Engineer (Civil), EHV CCCM Division, MSETCL, Latur.
The undersigned reserves all the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof.

Sd/-
Executive Engineer (Civil), EHV CCCM Division, MSETCL,Latur.


## गोल्डन विकली चान्सेस

मिलन (उदय/अस्त)(शनिवार)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | ३९० | ६ | २४० | ० | १४५ |
| | ४८० | | २६८ | | २३५ |
| | २२८ | | ३३० | | ५५० |
| | ९२-२१ | ३६-६७ | | ८०-०४ | |

कल्याण(उदय/अस्त)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | १३९ | १ | १४६ | ८ | १२५ |
| | २३८ | | ४७० | | २६० |
| | ६७० | | १०० | | ४४० |
| | ९३-३२ | ०१-१४ | | ७८-८६ | |

ता.२५ व २९ चे जबरदस्त चान्ससाठी
संपर्क करा
सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारी आहे. कृपया दुरुपयोग करु नये.
मोबा-९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४-० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ०-७ | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

दिवाळी बंपर चालू आहे 99 75 47 98 26

**सुर्यामाई फंक्शन हॉल**
सर्व सोयींनी युक्त
बुकिंग चालू आहे
आयटीआय कॉलेज समोर, देगलूर रोड, उदगीर जि.लातूर
संपर्क - ९७६५८४३००८
पॅकेज : रु ४००००/-





**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**
शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग

# कृषी उत्पन्न बाजार समीती उदगीर निवडणुक संदर्भात शिवाजी हुडे यांच्या बाजुने उच्च न्यायालयाचा निकाल



**उदगीर (प्रतिनिधी)** या घटनेची थोडक्यात हकीकत अशी की, सन २०२३ मध्ये कृषी उत्पन्न बाजार समीती उदगीर यांची निवडणुक प्रक्रिया पार पडली त्यामध्ये शिवाजी हनमंतराव हुडे यांच्या पॅनलने भगवान पाटील तळेगावकर यांच्या पॅनलचा धुवा उडऊन ती निवडणुक एकतर्फ्री जिंकली त्यामुळे शिवाजी हुडे यांना शह देण्यासाठी त्यांच्या विरोधकाने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, लातूर यांच्याकडे कलम ७२ अ प्रमाणे शिवाजी हुडे व निवडुण आलेल्या सर्व संचालका विरोधात रमेश भंडे व धनाजी गंगणबिडे यांनी डी. डी. आर. लातूर यांच्याकडे निवडणुक याचिका दाखल केली. २०१७ च्या निवडणुका नियमानुसार ही याचिका निकाल जाहीर झाल्यापासून ७ दिवसाच्या आत दाखल करणे गरजेचे होते. परंतु ही याचिका या नंतर दाखल करण्यात आली होती. त्यामुळे पुर्वीचे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था लातूर श्री. नाईकवाडे यांनी ही दाखल केलेली याचिका मुदतीत नाही म्हणुन फ्फ़ेटाळुण लावली. परंतु काही दिवसात लातुर डी. डी. आर. ची बदली होऊन त्या ठिकाणी श्री. बदनाळे नावाचे अधिकारी तेथे रुजू झाले. शिवाजीराव हुडे यांच्या विरोधकांनी यासंदर्भात परत पुर्नविचार याचिका श्री. बदनाळे यांच्या समोर दाखल केली त्या याचिकेवर श्री. बदनाळे यांनी सर्व संचालकाना नोटीस देऊन सुनावणीसाठी परत हजर राहण्याचे आदेश दिले त्यामध्ये संचालकातर्फे अॅड. उध्दव मोमले, अॅड. पांचाळ, अॅड. पदमाकर उगीले, अॅड. अजय डोनगावकर हे हजर होऊन संचालकातर्फ्रे युक्तीवाद केला. त्यामध्ये त्यांनी सदरील प्रकरणात जिल्हा उपनिबंधकाना सदरील पुर्नविचार याचिका चालवण्याचा अधिकार नाही हा मुद्दा उपस्थित केला. कारण नियम २०१७ मध्ये कोठेही पुर्नविचार याचिका बद्दल कायदयामध्ये तरतुद नाही. परंतु जिल्हा उपनिबंधकानी दाखल केलेली पुनर्विचार याचिका बेकायदेशीरपणे मंजुर केली. त्या नाराजीने शिवाजीराव हुडे यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्र. १९५९/२०२४ ही दाखल केली. दिनांक २१/०२/२०२४ ही याचिका सुनावणीसाठी मा. उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती एस. जी. मेहरे यांच्या खंडपीठासमोर आली असता याचीकातर्फे यांच्याकडून सिनीयर अॅड. श्री. महेश देशमुख यांनी युक्तीवाद केला त्यांचा युक्तीवाद ग्राह्य धरुन मा. उच्च न्यायालयाने दाखल केलेली याचिका मंजुर केली व जिल्हा उपनिबंधकानी दिनांक १२/०१/२०२४ रोजी दिलेले आदेश रद्द केले त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने असे सांगीतले की, जिल्हा उपनिबंधकाना सदरील प्रकरणात पुनःनिरिक्षण अर्ज चालवण्याचे अधिकार नाहीत त्यामुळे त्यांनी दिनांक १२/०१/२०२४ रोजी दिलेले आदेश चुकीचे असल्याने ते रद्द केले. त्यामुळे शिवाजीराव हुडे यांच्या विरोधात दाखल केलेली निवडणुक याचिका ही फ्फ़ेटाळण्यात आली ती कायदयाने बरोबर आहेत. सदरील प्रकरणात याचिकाकर्त्याकडून अॅड. महेश देशमुख, अॅड. उध्दव मोमले, अॅड. मनीष त्रिपाठी यांनी काम पाहिले व रमेश भंडे यांच्या माफ्फ़त अॅड. इरपतगीरे व जिल्हा उपनिबंधक यांच्याकडून अॅड. विठ्ठल दिघे व कृषी उत्पन्न बाजार समिती तर्फे अॅड. शैलेंद्र गंगाखेडकर यांनी काम पाहिले.

# केंद्रिय राज्यमंत्री रामदास आठवले यांची उद्या उदगीर येथे जाहीर सभा

**उदगीर (प्रतिनिधी)** रिपब्लिकन पार्टी ऑफ्फ़ इंडियाचे राष्ट्रीय पक्षाचे अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांची उदगीर येथे सायंकाळी पाच वाजता जिल्हा परिषद मैदानावर जाहीर सभा होणार आहे.

या सभेला महाराष्ट्र राज्याचे क्रीडामंत्री संजय बनसोडे, माजी आमदार गोविंदराव केंद्रे, रिपब्लिकन पक्षाचे मराठवाडा सरचिटणीस देविदास कांबळे, महाराष्ट्र राज्याचे सचिव चंद्रकांत चिकटे, रिपाइंचे लातूर जिल्हाध्यक्ष बाबासाहेब कांबळे ई उपस्थित राहणार आहेत.

तरी या सभेला जिल्ह्यातील रिपाइंचे पदाधिकारी व कार्यकर्ते, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन रिपाइंचे उदगीर तालुका अध्यक्ष अॅड.प्रफुल्लकुमार उदगीरकर, युवक आघाडीचे लातूर जिल्हाध्यक्ष सुशीलकुमार शिंदे व रिपाइकडुन करण्यात आले आहे.

# राष्ट्वादीच्या जि. सरचिटणीसपदी लाटवाले तर उपाध्यक्षपदी चंदन पाटील व चंद्रशेखर पाटील



**जळकोट (प्रतिनिधी)** येथील जेष्ठ कार्यकर्ते खादर लाटवाले यांची अजित पवार गटाच्या राष्ट्वादीच्या जिल्हा सरचिटणीसपदी तर जिल्हा परिषदेचे मा. सदस्य चंदन पाटील, आतनूरचे सरपंच चंद्रशेखर पाटील यांची उपाध्यपदी निवड करण्यात आली. निवडीचे पत्र राष्ट्वादीचे जिल्हाध्यक्ष अफ्फ़सर शेख यांच्या हस्ते देण्यात आले. तसेच बाजार समितीचे सभापती विठ्ठल चव्हाण, अँड. तात्या पाटील, तालुकाध्यक्ष अर्जुन आगलावे, एम.जी. मोमीन यांच्या हस्ते शाल, श्रीफळ देऊन जळकोट येथे सत्कार करण्यात आला. यावेळी नगरसेवक अजीज मोमीन, संग्राम हासुळे, शिरिष चव्हाण, जयराज दळवे,विनायक जाधव, महेताब बेग, सुर्यकांत धुळशेट्टे ,चेअरमन पवार, बालाजी उगीले, अंकुश करडे, नागेश कपाळे आदिसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

